विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | **सद्धर्म : त्रैमासिक** |
| संस्थापक | : | गुंडोपंत, हरिभक्त |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | अनंत विनायक धोरे |
| प्रकाशन वर्ष | : | २०१५ |
| वर्ष | : | एकोणपन्नासावे |
| अंक | : | चौथा |
| पृष्ठे | : | ३२ पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**

**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१५**

**गणपत्रिका क्रमांक : १८२**

Registered with the Registrar of News-paper for India, under R.N. 20770/71

सद्धर्म प्रकाशन

संस्थापक
गुंडोपंत हरिभक्त

वार्षिक ऐच्छिक देणगी
किमान ७५ रुपये

दीर्घकालीन (१५ वर्ष) सभासद देणगी १००० रु.
भारताबाहेरील सभासद देणगी १२५ $

# सद्धर्म
त्रै मा सि क

।। त्रैलोक्यं मंगलं कुरु ।। नामूलं लिख्यते किंचित् ।।

सुवर्णमहोत्सव १५ ऑगस्ट १९६५ ते १४ ऑगस्ट २०१५
वर्ष : एकोणपन्नासावे, अंक : चौथा, पौष/माघ शके १९३६, जानेवारी २०१५

## *संपादकीय*

### संस्कृतचा अभ्यास

भाषेबद्दलचा वाद हा भारतामध्ये एक फावल्या वेळचा धंदा होऊन बसला आहे. ह्यामध्ये जेव्हा राजकारण येते, तेव्हा तो भावना आणि अस्मितेचा मुद्दा होऊन बसतो. या वादाला जेव्हा जातीय रंग येतो तेव्हा तर तो अधिकच गंभीर होतो. पुरोगामी, सुधारणावादी हे जेव्हा त्यात उतरतात तेव्हा तर त्याला एका संग्रामाचे रूप येते. भाषा बाजूला राहून तो एक सिद्धान्ताचा लढा होऊन बसतो. आजच्या मराठी शाळांची परिस्थिती आणि इंग्रजीचे मराठीवरील वर्चस्व हे या वादाचेच फलित आहे.

भाषा हे संपर्काचे, म्हणूनच दळणवळणाचे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. भाषेमध्ये जेव्हा साहित्याची निर्मिती होऊ लागते तेव्हा तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे प्रतिबिंबही त्यात पडलेले दिसते. भाषा जेव्हा शास्त्रीय आणि अचूक होऊ लागते तेव्हा विज्ञानाचे ग्रंथही तीमध्ये निर्माण होऊ लागतात. याकरिता भाषेला लागणारी ताकद ही अनुभव आणि संशोधनातूनच प्राप्त होत असते. सध्याच्या केंद्रीय विद्यालयांतून तिसरी भाषा म्हणून जर्मन ऐवजी संस्कृत आणण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्नही असाच वादामध्ये सापडला आहे. कुठल्याही गोष्टीची सक्ती ही मूळ उद्दिष्टांना मारकच असते.

भाषेच्या क्षेत्रामध्ये संस्कृतला एक अनन्य साधारण महत्त्व आणि स्थान आहे, याबद्दल जगातल्या भाषेच्या अभ्यासकांमध्ये दुमत नाही. संस्कृतचे सामर्थ्य हे तिच्या रचनेमध्येच आहे. संस्कृत ही भारताच्या कुठल्याही प्रांताची भाषा नाही, तरीही गेल्या अडीच हजार वर्षांत, संस्कृतमध्ये जेवढे साहित्य उपलब्ध झाले तेवढे जगातील इतर कुठल्याही भाषेमध्ये झाले नाही. संस्कृत ही पाणिनी या भाषावैज्ञानिकांनी मांडलेली एक कृत्रिम

(पृष्ठ क्र. ३० वर)

## सद्धर्म त्रैमासिकासंबंधी माहिती व सूचना

१) 'सद्धर्म' त्रैमासिकाचे वर्ष एप्रिल ते मार्च आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्टच्या सद्धर्म प्रकाशनातर्फे हे त्रैमासिक एप्रिल, जुलै, ऑक्टोबर व जानेवारी या महिन्यात प्रसिद्ध केले जाते. या अंकाचे वर्षात केव्हाही सभासद होता येते. सभासद झाल्यावर त्या वर्षाचे ४ अंक पाठविले जातील.

२) ट्रस्टच्या कार्यालयाचा पत्ता : **सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट,** द्वारा लक्ष्मी-केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे-४००६०१.दूरध्वनी : २५४७२७७१ कार्यालयाची वेळ : सकाळी १० ते सायं. ७.

३) **सभासद देणगी** : वार्षिक ७५ रु., दीर्घकालीन १००० रु.(१५ वर्षाकरता)

परदेशस्थ सभासदांना १२५ पहिली आजीव सभासद योजना १९७६ ते १९७८ पर्यंत होती. त्याकरता देणगी फक्त २५ रु. होती. (त्यावेळी वार्षिक देणगी २ रु. होती.) काही तांत्रिक कारणाने ती योजना बंद करावी लागली. पुन्हा एप्रिल १९९८ ते मार्च २००० पर्यंत आजीव सभासद योजना अस्तित्वात होती. याकरता ५०० रुपये देणगी होती. गेल्या काही वर्षापासून महागाई उत्तरोत्तर वाढत जात आहे. यामुळे ही योजना एप्रिल २००९ पासून बंद करण्यात आलीव नवीन दीर्घकालीन सभासद योजना सुरु करण्यात आली आहे. ३१ मार्च २००९ पर्यंत झालेल्या सर्व आजीव सभासदांना हा अंक त्यांच्या हयातीपर्यंत पाठविला जाईल. बऱ्याच आजीव सभासदानी वाढत चाललेल्या महागाईचा विचार करुन आम्ही केलेल्या विनंतीनुसार ऐच्छिक देणगी म्हणून ५०० रुपये ते १००० रुपये पाठविले आहेत. ज्यांनी आजपर्यंत ऐच्छिक देणगी पाठविली नाही त्यांनी ती लवकर पाठवावी अशी कळकळीची विनंती आहे.

४) देणगी, मनीऑर्डर, धनादेश (चेक) किंवा धनरोखाने (डिमाण्ड ड्राफ्ट) ट्रस्टच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावी. देणगी पाठविताना आपले संपूर्ण नाव (संस्था अस त्यास अध्यक्ष किंवा कार्यवाह) पूर्ण पत्ता (पिन कोडसह) सभासद क्रमांक (सभासद असल्यास) व दूरध्वनी क्रमांक (कोड नंबरसह) ही माहिती सुवाच्य अक्षरांत कळवावी.

**देणगी ट्रस्टच्या खालील बँकांतील सेव्हिंज खात्यांतही भरता येईल.**

| बँक | शाखा | खाते क्र. | बँक IFSC कोड |
|---|---|---|---|
| स्टेट बँक ऑफ इंडिया SBI | जे के ग्राम, ठाणे (प.) | 108849300955 | SBIN 0009056 |
| ठाणे जनता सहकारी बँक TJSB | खोपट, ठाणे(प.) | 009110100016689 | TJSB 0000009 |
| ठाणे भारत सहकारी बँक लि. TBSB | मुख्य शाखा,ठाणे(प.) | 002115000024520 | TBSB 0000002 |

भारतीय स्टेट बँक त्यांच्या इतर शाखांतून आलेली रोख रक्कम (चेक नव्हे) ग्राहकांच्या खात्यांत जमा करण्याकरता २५ रुपये सेवा शुल्क आकारते. तेव्हा त्या बँकेत देणगी रोख रकमेत पाठविताना २५ रुपये अधिक पाठवावे.

वरील बँकांमार्फत देणगी पाठविल्यास पोस्टकार्डाने किंवा दूरध्वनी वरुन ट्रस्टच्या कार्यालयात किंवा श्री. प्रकाश भास्कर दीक्षित (कार्यकारी विश्वस्त) यांना कळवावे. यामुळे देणगीची नोंद घेणे सोयीचे होईल. (पत्ता पुढे दिला आहे.)

देणगी खालील ठिकाणी ही स्वीकारली जाते.

अ) **श्रीधर भालचंद्र आणि कंपनी**, कापडाचे व्यापारी, १४८, प्रार्थना समाज, गिरगांव, मुंबई - ४०० ००४. दूरध्वनी : २३८८०६४५ (रविवारी बंद) येथे **फक्त रोख रक्कम स्वीकारली जाईल. याठिकाणी मनीऑर्डर किंवा धनादेश पाठवू नये.**

५) सद्धर्म त्रैमासिकासंबंधी अधिक माहिती हवी असल्यास खालील ठिकाणी संपर्क साधावा.

**श्री. प्रकाश भा. दीक्षित**, ३०२, दुर्गा सोसायटी, कोलबाड, ठाणे ४०० ६०१. दू.क्र : २५४७२००५, भ्र.क्र: ९८१९६९३१९५

अंकाच्या पाकिटाच्या पत्त्यावर खालील माहिती छापली आहे.

सभासद क्रमांक वा. दे. (वार्षिक देणगीदार सभासद), दी. का. (दीर्घकालीन सभासद),आ. (आजीव सभासद), का.भे. (कायम भेट) 'वा. दे.' व 'दी. का.' याच्या पुढे देणगी संपण्याचा महिना व वर्ष दिले आहे.

**- संपादक**

## *अनुक्रमणिका*


| | |
|---|---|
| संपादकीय | १ |
| देणगीसंबंधी निवेदन | २ |
| संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार | ४ |
| सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचितो श्रीशिवमानसपूजा। | ५ |
| कौटिलीय अर्थशास्त्र | ६ |
| संतप्रणित ''नामस्मरणमहिमा'' | ८ |
| 'सगुण-निर्गुण | १५ |
| गीतकृष्णायन-भाग ३ . कृष्णलीला | १७ |
| वामनाची गोष्ट | २० |
| नामसाधना' या विषयावरील काही बोधवाक्ये | २६ |


**सद्धर्माची प्रकाशने**

(पोस्टेज सह)

| | |
|---|---|
| १) सुलभ संध्या व पूजा | रु. ५ |
| २) श्री गणेश चतुर्थी पूजाविधि | रु. ५ |
| ३) हरितालिका पूजा विधि | रु. १० |
| ४) श्री सत्यनारायण पूजा व कथा | रु. १५ |
| ५) कोजागिरी पूजाविधि (मराठी कथेसह) | रु. १० |
| ६) तुलसी विवाहविधि | रु. १० |
| ७) पातंजल योग सूत्राणि (मराठी अर्थासह) | रु.२५ |
| ८) कै. ह.ज. दामले स्मृती विशेषांक | रु.१५ |
| (या अंकात मौलिक विचारांचे लेख व उद्‌बोधक, उपयुक्त माहिती आहे. अवश्य संग्रही असावा, असा हा अंक आहे.) | |
| ९) सौंदर्यलहरी स्तोत्र (मराठी समश्लोकीसह) | रु.३० |
| १०) उपासना | रु. ४० |
| ११) श्रीरामरक्षेतील व्याकरण | रु. ५० |
| १२) चांगदेव पासष्टी | रु. ४० |
| १३) गंगालहरी | रु. २५ |
| १४) गणपत्यथर्व शीर्षांतील व्याकरण | रु. ३० |
| १५) सांख्यदर्शन | रु. ५० |

सद्धर्म प्रकाशनांत दूरूस्ती - १५. सांख्यदर्शन हे पुस्तक एप्रिल १३ पासून सवलतीच्या दराने ३०/- रुपयात देण्यांत येणार आहे. वाचक व देणगीदारांनी याचा फायदा घ्यावा.

**दीर्घकालीन सभासद (दी का)**

श्री. कमलाकर विठोबा कुलकर्णी, पेठ भुम

श्री. विभाकर गणेश दिंडोरकर, पुणे

श्री. विश्वनाथ स. गोडबोले, ठाणे

**देणगी ऑक्टोबर ते डिसेंबर २०१४**

श्री. कुलकर्णी बावीकर क. वी. रु.५००/-

**- संपादक**

लेख २१ वा

**प्रारब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम्** [२९१]

सुरू केलेले कार्य पूर्ण करणे हे बुद्धीचे दुसरे लक्षण आहे.

सुभाषिताची पहिली ओळ : **अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम्।** एखादे काम आपण पूर्ण करू शकणार नाही असे वाटत असेल तर ते न सुरू करणे हे बुद्धीचे पहिले लक्षण आहे.

**व्रजत्यधः प्रयात्युच्चैर्नरः स्वैरेव चेष्टितैः** [२९२]

मनुष्याची अधोगती अथवा उन्नती स्वकर्मानेच होत असते.

सुभाषिताची पहिली ओळ : **अधः कूपस्य खनकः, ऊर्ध्वं प्रसादकारकः।** विहीर खणणारा खाली खाली जातो व मनोरे बांधणारा वर वर.

**क्षमा शस्त्रं करे यस्य, दुर्जनः किं करिष्यति।**[२९३]

ज्याच्या हातात क्षमा नावाचे हत्यार आहे त्याचे दुर्जन काय करू शकतो?

दुसरी ओळ : **अतृणे पतितो स्वयमेवोपशाम्यति॥** जिथे (सुके) गवत नसते तिथे पडलेला अग्नी आपणहूनच विझून जातो.

**असारे खलु संसारे सुखभ्रान्तिः शरीरिणाम्** [२९४]

माणसाला ह्या असार संसारात सुखाची भ्रान्ती मात्र होत असते. खरे सुख मिळत नाही.

**लालापानमिवाङ्गुष्ठे बालानां स्तन्यविभ्रमः॥** लहान मूल अंगठा चोखून लाळ पीत असते व त्याला वाटते, आपण मातृस्तनातून दूधच पीत आहोत. अशीच सुखाबद्दल मनुष्यावस्था आहे. सुख पाहता जवापाडे, दुःख पर्वताएवढे.

**षड् जीवलोकस्य सुखानि राजन्॥**[२९५]

हे राजा, माणसाच्या जीवनात खरी सुखे सहा आहेत. अर्थागमो (सतत पैसा मिळत राहणे) नित्यमरोगिता च (उत्तम तब्येत) प्रिया च भार्या (प्रेमळ पत्नी) प्रियवादिनी च (प्रियबोलणारी)) वश्यश्च पुत्रः (मुलगा आज्ञाकारी) अर्थकरी च विद्या (पैसा मिळवून देणारी विद्या)

**देवो न जानाति कुतो मनुष्यः?**[२९६]

ह्या गोष्टी देवदेखील सांगू शकणार नाही तिथे माणसाची काय कथा?

**अश्वप्लूतं, वासवगर्जितं च**
**स्त्रीणां च चित्तं, पुरुषस्य भाग्यम्।**
**अवर्षणं च्याप्यतिवर्षणं च।...**

धावताना मध्येच घोड्याने मारलेली उडी, ढगाची गर्जना, स्त्रियांची लहर, पुरुषाचे भाग्य, पाऊस न पडणे तसेच तो फार पडणे.

**'आशा' नाम मनुष्याणां काचिद् आश्चर्यशृङ्खला।**[२९७]

'आशा' नावाची माणसांची एक आश्चर्यकारक साखळी आहे.

**यया बद्धा प्रधावन्ति, मुक्तास्तिष्ठन्ति पङ्गुवत्॥** ह्या साखळीने जे बांधले जातात

(पृष्ठ १९ वर)

## सार्थ श्रीशङ्कराचार्यविरचिता श्रीशिवमानसपूजा । 

दि. दा. औटी

लेख ४ था

**श्लोक ४ था**

**आत्मा त्वं गिरिजा मतिः सहचराः प्राणाः शरीरं गृहम्**
**पूजा ते विविधोपभोगरचना, निद्रा समाधिस्थितिः ।**
**संचारः पदयोः प्रदक्षिणविधिः स्तोत्राणि सर्वागिरो**

**यद्यत्कर्म करोमि तत्तदखिलं शंभो तवाराधनम् ।।४ ।।**

**संधी** - विविध+उपभोग अ+उ = ओ गुण
यत् (द्) यत् (द्) कर्म, तत् (द्) तत् (द्) अखिलं तव+आराधनम्

**समास** - गिरौ जाता गिरिजा-शैल-जा पर्वतावर जन्मलेली पार्वती
सह चरन्ति ते इति वा। सहकारी
समाधिः इति स्थितिः - समाधी
प्रदक्षिण विधिः - प्रदक्षिणा

**अन्वय व भाषांतर एकत्र :**

त्वं (मम) आत्मा (असि)। हे शंभो, तू माझा आत्मा आहेस. गिरिजा (मम) बुद्धिः। पार्वती माझी बुद्धी आहे.

(तव) सहचराः (मम) प्राणाः (सन्ति)। तुझे सहकारी माझे प्राण आहेत.

(तव) शरीरं (मम) गृहम् (अस्ति)। तुझे शरीर माझे घर आहे.

विविधभोगरचना तव पूजा (अस्ति)। निरनिराळे जे भोग मी घेतो ती तुझी पूजा आहे.

(मम) निद्रा इति समाधिस्थितिः (अस्ति)। माझी झोप ही समाधी स्थिती आहे.

(मम) पादयोः सञ्चारः इति प्रदक्षिणविधिः। माझे चालणे ह्या तुला घातलेल्या प्रदक्षिणाच आहेत.

(मम) सर्वाः गिरः(तव) स्तोत्राणि एव। माझे सर्व बोलणे म्हणजे तुझी स्तोत्रेच आहेत.

यद् यद् कर्म करोमि तद् तद् अखिलं हे शंभो तव आराधनम् एव। जे जे काम मी करतो ते ते सर्व हे शंभो, तुझी उपासनाच आहे.
क्रमशः

दि. दा. औटी

●●●

### निवेदन

ऑगस्ट १९६५ पासून गेल्या ४९ वर्षांत, सद्धर्म त्रैमासिकाचे संस्थापक कै. गुंडोपंत हरिभक्त उर्फ महादेव गोविंद नवाथे व भूतपूर्व संपादक कै. हरी जनार्दन दामले यांनी वेळोवेळी सद्धर्ममध्ये लेख व स्फुटे लिहिली होती. सुवर्णमहोत्सवी वर्षातील एक उपक्रम म्हणून नवीन पिढीतील वाचकांसाठी, यापुढील काळात सद्धर्म त्रैमासिकात ती वेळोवेळी प्रसिद्ध केली जाणार आहेत. याची वाचकांनी नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

- संपादक

लेखांक - ५

धनानंदाच्या दानविभागात काम करत असताना धनानंदाच्या अंतर्गत राज्यकारभाराविषयी अधिकारी आणि नागरिकांच्या मनात असणारा असंतोष कौटिल्याच्या लक्षात आला आणि क्रांतीचा विचार त्याचा मनात निश्चित होऊ लागला. कौटिल्याला झालेल्या या जाणिवेची, त्याच्या वाढत्या लोकप्रियतेची कुणकुण धनानंदाला लागली होती. एके दिवशी भर राजसभेत त्याने कौटिल्याचा अपमान केला आणि त्याला पदच्युत केले. असे घडणार याची कौटिल्यालाही कल्पना होती. त्यानेही प्रतिज्ञा केली की, ''नंदकुलाचा समूळ उच्छेद करून मगधभूमीला मुक्त करीन तेव्हाच मी शिखा (शेंडी) बांधीन.''

क्रांतीच्या दृष्टीने मगधातील लोकांचे मतपरिवर्तन करायला कौटिल्याने सुरुवात केली होतीच, पण प्रश्न मगधापुरता मर्यादित नव्हता. राष्ट्र म्हणून भारताला समर्थ करायचे असेल तर क्रांतीची व्याप्ती मगधसीमांपलीकडे नेणे आवश्यक होते. म्हणूनच मगधातून बाहेर पडलेला कौटिल्य भारतभ्रमणाला निघाला. या भारतभ्रमणदरम्यान कौटिल्याने भारतातील अनेक प्रदेशांतून प्रवास केला असावा. या प्रवासात त्याने अनेक प्रकारचे लोक, त्यांचे व्यवसाय, त्यांतील बारकावे, राजकीय, सामाजिक, परिस्थिती इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण केले. त्याचे हे निरीक्षण कौटिलीय अर्थशास्त्रातील विविध व्यवसायांविषयीच्या सखोल ज्ञानावरून लक्षात येते. या प्रवासात त्याला, मुलांचा पुढारी होऊन खेळणारा चंद्रगुप्त दिसला. क्रांतीसाठी आवश्यक असे नेतृत्व आणि भावी सम्राट त्याला चंद्रगुप्ताच्या रूपाने लाभला. चंद्रगुप्ताला नेता व सम्राट म्हणून घडविणे हे कौटिल्याचे मुख्य कार्य होते. कौटिल्याने चंद्रगुप्ताला तक्षशिलेला नेऊन, युद्धविद्या आणि राजनीतीत पारंगत केले.

याच सुमारास, कौटिल्याला ज्याची चिंता होती असे परकीयांचे आक्रमण-संकट सिकंदराच्या रूपाने भारतासमोर उभे ठाकले. सीमेवरील लहान लहान राज्ये जिंकत सिकंदर पुढे पुढे सरकू लागला. पण मालव, शूद्रक, यौधेय इत्यादी गणराज्यांनी त्याला कडवा विरोध केला. शूद्रकगणांशी लढत असता सिकंदर बाण लागून घायाळ झाला. त्याची महत्त्वाकांक्षाही मावळू लागली. जिंकलेल्या भूभागांवर आपले अधिकारी नेमूने तो मायदेशी परतला.

सिकंदराच्या या स्वारीचे चाणक्य चंद्रगुप्त हे दोघेही प्रत्यक्ष साक्षीदार होते. सिकंदराची युद्धनीती, शस्त्रास्त्रे, सैन्याची वैशिष्ट्ये त्यांनी सूक्ष्म दृष्टीने पाहिली. भारतातून परत फिरल्यावर थोड्याच दिवसांत सिकंदर मरण पावल्याची वार्ता आली. आता नजीकच्या काळात परकीय आक्रमणांचे भय नाही हे पाहून, कौटिल्याने क्रांतीच्या दृष्टीने वेगाने पावले उचलायला सुरुवात केली.

वायव्येकडील प्रदेश ग्रीकांच्या अमलातून मुक्त करून, मार्गावरील राज्ये जिंकत चाणक्य

चंद्रगुप्त मगधापर्यंत पोहोचले. मगधाच्या धनानंदाकडे सैन्यबळ व अर्थबळ प्रबळ होते. त्याच्या जोरावर धनानंदाने चंद्रगुप्ताचा प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला, पण चंद्रगुप्ताच्या विजयी मोहिमेपुढे धनानंदाच्या सैन्याची धूळधाण उडाली. नंदकुलाचा निःपात करून चंद्रगुप्त विजयी झाला. क्रांती यशस्वी झाली. चाणक्याची प्रतिज्ञा पूर्ण झाली. चंद्रगुप्त सम्राट झाला. चंद्रगुप्ताच्या राज्याची घडी सुव्यवस्थित बसावी म्हणून चाणक्याने चंद्रगुप्ताच्या राजयाचे महामात्यपद स्वीकारले हळूहळू चंद्रगुप्ताने नर्मदेमर्यंतचा भूभाग आपल्या आधिपत्याखली आणला आणि राज्यविस्तार केला. भविष्यात अनेक राजसत्तांसाठी आदर्श ठरावी अशी स्थिर, सुरक्षित आणि सुविहित राजव्यवस्था चाणक्य चंद्रगुप्त या गुरु-शिष्य जोडीने भारताला दिली. जवळजवळ संपूर्ण उत्तर भारतावर एकछत्री अंमल स्थापन केलेला चंद्रगुप्त हा भारतीय इतिहासातील पहिला सम्राट होय.

मनुष्य मरण पावला की कालांतराने त्याचे विचारही नष्टप्राय होतात या विचाराने की काय, कौटिल्याने पूर्वाचार्यांच्या मताचा आढावा घेऊन निश्चित केलेले, आदर्श राज्यपद्धतीविषयीचे आपले क्रांतादर्शी विचार ग्रंथरूपाने (कौटिलीय अर्थशास्त्र) मांडले. हे विचार आजही मार्गदर्शक ठरतात.

कौटिल्याच्या कर्तृत्वाने आणि व्यक्तित्वाने केवळ विचारवंतच नाहीत तर नाटकाकारही भारावले आहेत. एरवी राजेराण्यांच्या प्रेमकथांतच रममाण झालेल्या संस्कृत नाट्यसाहित्यात चाणक्याच्या जीवनावर आधारित राजकीय नाटक लिहिण्याचा मोह नाटककार विशाखदत्ताला आवरला नाही. नंदवंशाचा नाश झाल्यावरही नंदकुलाशी एकनिष्ठ असलेला अमात्य राक्षस आणि महामात्य चाणक्य यांच्यात रंगलेल्या शीतयुद्धावर बेतलेले 'मुद्राराक्षस' हे नितांतसुंदर नाटक विशाखदत्ताने रचले. या नाटकाचा नायक कुणी राजा नाही तर राजकरणपटू बुद्धिवीर चाणक्य आहे. या नाटकातील निर्देशानुसार महामात्य म्हणून पद भूषवीत असतानाही चाणक्य कधी राजाप्रसादात राहिला नाही. तर पर्णकुटीत राहून संन्यस्त जीवन जगला. तिथूनच तो राजाला मार्गदर्शन करत असे. त्याबरोबरच ग्रंथलेखनाचे आणि ज्ञानदानाचे कार्यही करत असे. विशाखदत्ताने मुद्राराक्षस नाटकाच्या तिसऱ्या अंकात चाणक्याच्या पर्णकुटीचे शब्दचित्र रेखाटले आहे.

'उपलशकलमेतत् मेदक गोमयानां
बटुभिरुपहृतानां बर्हिषां स्तूपमेतत् ।
शरणमवि समिद्भिः शुष्यमाणाभिराभिः
विनमितपटलान्तं दृश्यते जीर्णकुड्यम् ॥

सुकवलेल्या गोवऱ्या फोडण्यासाठी हा दगडाचा तुकडा ठेवला आहे. शिष्यांनी आणलेल्या दर्भगवताची रास पडली आहे. सुकण्यासाठी ठेवलेल्या समिधांनी खाली छपराच्या कडा वाकलेले, जीर्ण भिंती असलेले हे महामंत्री चाणक्याचे घर आहे.

राजसत्ता, अधिकार, संपत्ती पायाशी लोळण घेत असताना निरासक्त बुद्धीने ज्ञानदानाचे कर्तव्य पार पाडणारा चाणक्य म्हणजे एक ऋषीच होता. हेमचंद्राच्या आर्यमंजूश्री मूलकल्प आणि

(पृष्ठ २५ वर)

नवविधा भक्ती म्हणजे ''श्रवणं कीर्तन विष्णोस्मरणं पादसेवनम् । अर्चनं वंदनं दास्यं सख्यात्मनिवेदनम् ।।'' आणि या नऊ प्रकारांत स्थलकालनेमबंधनातीत, सर्वांसाठी, जातिधर्म वंशलिंगपंथादी भेदातीत, सर्वांत सोपा प्रकार म्हणजे ''नामस्मरण'' हे वेगळे सांगण्याची गरज नाही. भक्तिमार्गातील सर्वांत महान, सर्वांत सुलभ प्रकार. ''नामे तरले पाषाण'' एवढे माहात्म्य असणारा. ब्रह्मर्षी नारदही अखण्ड ''नारायण'' हेच नाम घेत असतात. वाल्याचा वाल्मिकी नामस्मरणानेच झाला. या नामसाधनेविषयी प्रत्यक्ष भगवंतापासून अनेक संतमहात्म्यांनी याविषयी जे सांगितले त्या विचारपुष्पांचा पुष्पगुच्छ ज्यात प्राजक्ती सुगंध व शुभ्रधवलता आहे व ती अनुभवणे हा अप्रतिम अद्वितीय अनोखा आनंद आहे, तो या छोट्या लेखाद्वारे वाचकांना देण्याचा अल्पमतीने प्रयत्न आहे कारण जीवन म्हणजे ''अंतरी आपुल्या झरा झुळझुळे, नीळा नीळा स्वच्छंद । जीवन म्हणजे उधळीत जाणे, हृदयातील आनंद'' असे मला वाटते त्यामुळे हा आध्यात्मिक विचारानंद या लेखाद्वारे देण्याचा प्रयास आहे.

नामविषयी श्रुतिप्रमाण अथर्ववेदान्तर्गत कलिसंतरणोपनिषदात दिले आहे ते असे :-

''सर्वश्रुतिरहस्यगोप्यं तत् श्रुणु । येन कलिससारं तरिष्यति ।
भगवदादिपुरुषस्य नारायणूस्य नामोच्चरणमात्रेण निर्धूतकलिः भवति ।
नात : परतरोपा : सर्ववेदेषु दृश्यते ।
नास्य विधिः । सर्वदा शुचिः अशुचिः वा पठन् कोऽपि सायुज्यतामेति ।
सदा सार्थ-त्रिकोटिर्जपति तदा पूतो भवति । सद्योमुच्यते ।।''

नाम भगवंताचे अस्तित्व प्रकट करते - हरिःॐ हे प्रत्येक वेदमंत्रारंभी असलेले नामच. त्यामुळे जसे वेद अनादि तसेच नामही अनादी व वेदाप्रमाणेच अपौरुषेय व अनंत - नामस्मरण व नामसंकीर्तन यांत संगम आहे तो ज्ञान, कर्म, भक्ती व प्रेम या चार गोष्टींचा होय.

संत ज्ञानेश्वर माउलींनी भावार्थदीपिकेत (ज्ञानेश्वरीत) भक्तिमार्गाचे जे भाष्य केले आहे त्यात हे नामाचे माहात्म्य फार सुंदर वर्णन केले आहे. ज्ञानेश्वरीतील १२ वा अध्यायात ओवी क्र. ४० ते ५९ मध्ये हे बहारदार वर्णन त्यांनी केले आहे. त्या ओव्या अशा :-

''आणि येर तेहि पांडवा । जे आरुढोनी सोऽहंभावा । झोंबती निरवयवा । अक्षरासी ।।४०।। मनाची नखी न लगे । जेथ बुद्धिची द्रष्टि न रिगे । इंद्रिया कीर जोगे । काइ होईल ।।४१।। परि ध्यानाही कुवाडे । म्हणोनि एके ठायी न संपडे । व्यक्तिसि माजिवडें । कवणेही नोहे ।।४२।। जया सर्वत्र सर्वपणे । सर्वाही काळी असणे । जे पावूनि चिंतवणे । हिंपुटी जाहले ।।४३।। जे होय ना नोहे । जे नाही ना आहे । ऐसे म्हणोनि उपाये । उपजतीचिना ।।४४।। जे चळे ना ढळे । सरे ना मैळे । ते आपुलेनिचि बळे । आंगविले जिही ।।४५।। पैं वैराग्यमहापाव के । जाळूनि

विषयांची कटके। अधपली तवके। इंद्रिये धरिली ॥४६॥ मग संयमाची धाटी। सूनि मुरडिली उफराटी । इंद्रिये कोंडली कपाटीं । हृदयांचा ॥४७॥ अपानीचिया कवाडा । लावोनि आसनसमुद्रा सुहाडा । मूळबंधाचा हुडा । पन्नासिला ॥४८॥ आशेचे लाग तोडिले । अधैर्याचे कडे झाडिले । निद्रेचे शोधिले । काळवखे ॥४९॥ वज्राग्नींचां ज्वाळी । करुनि अपानधातूंची होळी । व्याधींचा सिसाळीं । पूजिली यंत्रे ॥५०॥ मग कुंडलिनियेचा टेंभा । आधारी केला उभा । तया चोजविले प्रभा । निमथावरी ॥५१॥ नवद्वारांचा चौचकी । बाणूनि संयतीची आडवंकी । उघडली खिडकी । ककारांतीची ॥५२॥ प्राणशक्तिचामुंडे । प्रहारुनी संकल्पमेढे । मनोमहिषाचेनि मुंडे । दिधली बळी ॥५३॥ चंद्रसुर्या बुझावणी । करोनि अनाहताची सुडावणी । सतरावियेचे पाणी । जिंतिले वेगे ॥५४॥ मग मध्यमामध्यविवरे । तेणे कोरिवे दादरे । ठाकिल चवरे । ब्रह्मरंध्रीचे ॥५५॥ वरी मकारांत सोपान । तें सांडोनिया गहन । काखे सूनिया गगन । भरले ब्रह्मी ॥५६॥ ऐसेनि जे समबुद्धी । गिळावया सोऽहं सिद्धी । आंगविताति निरवधी । योगदुर्गे ॥५७॥ आपुलिया साटोवाटी । शून्य घेती उठाउठी । तेही मातेचि किरीटी । पावली गा ॥५८॥ वाचूनि योगाचेनि बळे । अधिक काही मिळे । ऐसे नाही आगळे । कष्टचि तया ॥५९॥

या सर्व ओव्यांमधून योगमार्ग कठीण आहे. सामान्य जनांना या योगमार्गाने जाणे दुरापास्त आहे. म्हणून त्यांच्यासाठी सरळ सोपा सहजसाध्य मार्ग भक्तीचा व त्या नवविधा भक्तिप्रकारांत नामस्मरणाचा अत्यंत सोपा मार्ग आहे हे विशद केले आहे. योगमार्गात साधकाला अत्यंत खडतर अशी साधना करावी लागते. आयुष्य या साधनामार्गात खडतर होते. म्हणूनच वरील ओव्यांपैकी ५९वी ओवी ''वांचूनी योगाचनि बळे । अधिक काही मिळे । ऐसे नाही आगळे । कष्टचि तया ॥'' असे यथार्थ वर्णन आहे. योगमार्गात यमनियम, आसने, इडा, पिंगला, सुषुम्ना नाड्यांचे ज्ञान धौतीनौती, प्राणायाम इ. क्रिया अत्यंत खडतर असतात त्यामुळे त्यांवर प्रभुत्व मिळविणे महादुष्कर असते. यात धोकेही फार असतात. हानीसंभव खूप असतो. ''जे पिंडी ते ब्रह्माण्डी'' असे असल्याने मानवदेहधारी पिंडीतील साहित्य घेऊनच ही योगसाधना करावी लागते व त्यात चूक झाली तर योगमार्ग हाती येतच नाही उलट साधकाच्या प्राणावरही बेतते. या मार्गात तज्ज्ञ परिपूर्ण गुरू असणे अत्यंत आवश्यक आहे. श्रीगजाननविजय ग्रंथातही गजानन महाराजांनी या मार्गाची खडतरता सांगिती आहे. ''गोगलगाय शेव किडा । हिमालया न देईल वेढा । सागरीचा सिंप किडा । मेरुपर्वता न जाय कधी ॥'' असे त्यांनी सांगितले आहे १९ व्या अध्यायात निमोणकर नावाच्या योगमार्गे जाणाऱ्या साधकास. तेव्हा सामान्य जनांना हा मार्ग अवलंबिणे महाकठीण. त्यांच्यासाठी मग कोणता मार्ग? तर भक्तिमार्ग , त्यातही नामस्मरण हा प्रकार. भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला म्हणून सांगतात ''म्हणोनि येर ते पार्थां । नेणतीचि व्यथा । जे का भक्तिपंथा । वोटंगिले ॥

ज्ञानेश्वर माउली सांगते की योग्याच्या ठिकाणी म्हणजे योगमार्गसाधकास ''तया दुःखाचिया वाटा । भागा आला.'' अध्याय १२ - ज्ञानेश्वरीमधील ९० व्या ओवीत भगवान श्रीकृष्ण सांगतातः

''नामाचिया सहस्रवरी। नावाड्या अवधारी।
सजूनिया संसारी। तारु जाहलो॥'' म्हणजे मी माझ्या नावाच्या सहस्र नावा तयार केल्या आहेत व भक्तांना तारणार्थ (त्यांचा उद्धार या रूपे करण्यास) मी नावरूप झालो आहे . भक्तिपंथ-नामस्मरणमार्गे जाणाऱ्यास कसलेच कष्ट/सायास होत नाहीत.

श्रीज्ञानेश्वर माउलींनीही नाममाहात्म्य हरिपाठात उत्तम वर्णन केले आहे. त्यातील एक अंश येणेप्रमाणे :-

''काळवेळ नाम उच्चारिता नाही।
दोन्ही पक्ष पाही उद्धरती॥
रामकृष्ण नाम सर्व दोष हरण।
जडजीवा तारण हरि एक॥
हरिनाम सार जिव्हा या नामाची।
उपमा त्या दैवाची कोण वाणी॥
ज्ञानदेवज्ञ सांग झाला नामपाठ।
पूर्वजा वैकुंठ मार्ग सोपा॥''

श्रीज्ञानेश्वर माउलींनी ज्ञानेश्वरीच्या ९ व्या अध्यायात ओवी क्र. १९७ ते २०० मध्ये याच नामाचे माहात्म्य वर्णन केले आहे ते असे -

''तरी कीर्तनाचेनि नटनाचे।
नाशिले व्यवसाय प्रायश्चितांचे।
जे नामचि नाही पापाचे। ऐसे केले॥
यमदमा अवकळा आणिली।
तीर्थे ठाण्यावरुनी उठविली।
यमलोकी खुंटली। रहाटी आघवी॥
यमु म्हणे काय यमावे।
दमु म्हणे कवणाते दमावे।
तीर्थे म्हणती काय खावे।
दोष ओखदासी नाही॥
ऐसे माझेनी नामघोषे।
नाही करती विश्वासी दुःखे।
अवघे जगचि महासुखे।
दुमदुमित भरले॥''

याचा भावार्थ संक्षेपात असा की, नामाच्या ठिकाणी एवढे सामर्थ्य आहे की तीर्थे ओस पडली, यमलोक उजाड झाला. अवघ्या जगात महासुखाचा आनंदीआनंद दुमदुमला.

संत तुकाराम व एकनाथही सांगतात, जेथे नामस्मरण होत असते तेथे यमही जाऊ शकत नाही. ''यम सांगे दूता। तुम्हा नाही तेथे सत्ता। जेथे होय कथा। सदा घोष नामाचा॥''
''नका जाऊ त्यांच्या गांवा।
नामधारकाच्या शिवा।
सुदर्शन त्याच्या घरटी। फिरे भोवती॥''

नाम हे असे सुदर्शनचक्र बनून रक्षण करते, त्यामुळेच यमाने यमदूतांना तेथे जाऊ नका असे सांगितले आहे. एवढे नामाचे सामर्थ्य आहे हे वरील ओव्यांतून/अभंगांतून स्पष्ट होते. याचे कारण प्रत्यक्ष परमेश्वरानेच आपल्या नामात आपल्यापेक्षा अधिक शक्ती/सामर्थ्य ठेवले आहे व हे स्वतः परमेश्वरानेच सांगितले आहे ते येणेप्रमाणे :-

''स्वयंनारायणो देवः स्वनाम्नि जगतांगुरुः।
आत्मनोऽभ्याधिकां शक्तिंस्थापयामास सुव्रताः॥''

आणि याच कारणाने जो नामस्मरण करतो त्याच्या अंगी गंगा आदी नद्यांचे पावित्र्य येते आणि हे नामस्मरण बुद्ध्याच केले पाहिजे असे नाही, तर सहजभावे केले तरी चालते. नामस्मरणाने

भक्त आपला उद्धार करून घेतात, त्यासाठी अनुष्ठान, सप्ताह, व्रतवैकल्य यांची काहीही आवश्यकता नाही तसेच यज्ञयाग इ.क्रिया / कर्म करण्याची आवश्यकता तर नाहीच नाही.

वामनपंडितांचा यासंबंधीचा श्लोक फार बोलका आहे तो असा :

''न कळता पद अग्नीवरी पडे।
न करी दाह ऐसे कधी ना घडे।
अजितनाम वदो भलत्या मिसे।
सकलपातक भस्म करीतसे॥''

म्हणजे नकळत जरी पाय अग्नीवर पडला तरी तो पोळतोच. तेथे पाय नकळत पडला म्हणून आग्नी त्याचा अग्नीपणा जसा सोडत नाही तसेच या नामस्मरणाचे आहे. अगदी सहजरीत्या घेतले तरी ते सर्व पापांचे भस्म केल्याशिवाय राहत नाही, एवढे ते जाज्वल्य आहे. कोणत्याही मिषाने ह्या त्याच्या प्रखरत्वाला कमीपणा येत नाही ते प्रखरत्व अजेय आहे, ते लगेच प्रकट होते व पातकांचे भस्म करते. याचे उदाहरण म्हणजे अजामिळाचे. शुद्र वेश्येच्या मुलाच्या मिषाने झालेल्या नामस्मरणाने अजामिळाचा उद्धार झाला.

चैतन्य महाप्रभू सुद्धा या नामशक्तीविषयी म्हणतात :

''नाम्नाकारी बहुधा निजसर्वशक्ति।
सात्रार्पिता नियमितः स्मरणे न कालः॥''

हे नामस्मरणाचे अत्यंत सुलभ सोपे साधन खुद्द भगवंतानेच दिले म्हणून संत तुकारामही म्हणाले की :- ''सोपे वर्म आम्हा सांगितले संती। टाळ दिंडी हाती घेऊन नाचा॥''

श्रीज्ञानेश्वर माउलींचा ''हरिपाठ'' हा ग्रंथसुद्धा नामस्मरणाचे महत्त्व/महती विषद करतो वेदान्त सिद्धान्ताप्रमाणे जीवच भगवतूस्वरूप आहे, पण अनंत जन्मांतील पापांमुळे मनात विविध दोष उत्पन्न होतात व त्यामुळे भगवंताची प्राप्ती होत नाही. नामस्मरणाने सर्व पापक्षालन होऊन पापवासनाच नष्ट होते. यज्ञयागादि पुण्यकर्मांच्या अनुष्ठानाने जे पुण्य मिळते त्या सर्व पुण्यापेक्षाही नामस्मरणाचे पुण्य अगाध आहे. पुण्यावाचून दृढ श्रद्धा नाही, दृढ श्रद्धेशिवाय ईश्वरसाक्षात्कार नाही व दृढ श्रद्धापूर्वक अखण्ड नामस्मरण ईश्वराचा अखण्ड साक्षात्कार घडवते. सतत वाणीने नामस्मरण करावे. चारी वेद व सहाशास्त्रे ईश्वराचा नाममहिमा सांगतात.

एकनाथ महाराज म्हणतात, ''मजलागी रंगली चित्तवृत्ती। यालागी विसरली गृहासक्ती। तया गृहस्थाश्रमीच माझी प्राप्ती। निश्चये जाण उद्धवा.'' संत तुकाराम महाराजही ''न लगती सायास जाणे वनांतरा। सुखे येतो घरा नारायण।'' हेच सांगतात. ते असेही म्हणतात, ''अठरा पुराणांचे पोटी। नामेविण नाही गोठी॥'' ''एकनाथ महाराज तर ''वेदांचा संवाद श्रुतींचा अनुवाद। नामाचा मकरंद पुराण वदे।'' असे प्रतिपादन करतात. नामस्मरण व स्तवन करणे हाच सर्व धर्मांत श्रेष्ठ धर्म. सांबपुराणातही ''यदन्यत् कुरुते कर्म यदि वा न करोति च। कृतेन जपयज्ञेन परां सिद्धिमवाप्नुयात। अशी नामजपाची महती सांगितली आहे. अन्य कर्म करा वा न करा, नामजप परमगती देईल.

नामस्मरण श्रद्धाभावयुक्तच असावे तरच त्याचे फळ मिळते. समर्थ रामदास दासबोधाच्या

३ऱ्या अध्यायात्प (३.१०) सांगतात की ''जैसा भाव जयापाशी। तैसा देव तयासी। जाणे भाव अंतरसाक्षी। प्राणिमात्रांचा ॥१३॥ जरी भाव असेल मायिक। तरी देव होय महा ठक। नवल तयाचे कौतुक। जशास तसा ॥१४॥'' भावापाशी देव त्वरित उभा असतो असे तुकारामही सांगतात. नामस्मरण भगवंताला भक्तप्रतिपाळ करण्यास भाग पाडते याबद्दल दासबोधात (४-३-३१) ''काहीच न करोनी प्राणी। रामनाम जपे वाणी। तेणे संतुष्ट चक्रपाणी। भक्तांलागी सांभाळी ॥'' असे समर्थ रामदास प्रतिपादन करतात पण श्रद्धाभाव असलेलेच नामस्मरण हे घडविते, यांत्रिक नामस्मरण नव्हे हे लक्षात घ्यावे. ''ज्ञानदेव म्हणे नाम हे सुलभ। सर्वत्र दुर्लभ विरळा जाणे॥'' असे हरिपाठात लिहिले आहे. नामस्मरणात जसा ईश्वर साह्यकारी असतो तसा इतर साधनांत नसतो. म्हणून नामस्मरण हेच श्रेष्ठतम असे ईशप्राप्तीचे अमोघ अचूक साधन आहे हे समस्त श्रुती, स्मृती, पुराणादि शास्त्रे व आजवरच्या समस्त संतमहात्म्यांनी स्वानुभवाने उपदेशिले आहे. ज्ञानेश्वर माउलींचा त्रिवार सत्य सिद्धान्त सांगतो की ''जन्मजन्मांतरी। असेल पुण्यसामुग्री। तरीच नाम जिव्हाग्री। येईल श्रीरामाचे'' अखण्ड नामस्मरण केवळ नाम घेणाऱ्यासच तारते असे नाही तर त्याच्या कुळाचाही उद्धार करते. हे सामर्थ्य नामस्मरणशिवाय अन्य साधनात नाही. अखण्ड नामस्मरण करणारा नामधारक सच्चिदानंद ईशरूप होतो म्हणजेच निर्गुण ब्रह्माशी ऐक्य होते व संतांच्या अनुभवाने असे सांगितले आहे ''ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनी। भाग्य तरी ऋणी देवा ऐसा '' त्याप्रमाणे देहादिकाला वगळून ब्रह्माशी एकरूपत्व हे ज्ञान होय व देहासह ब्रह्माशी एकरुप होणे ही भक्ति

मोरोपंत त्यांच्या केकावलीत लिहितात :-

''तुम्हा समचि हें गुणें, अणु उणें नसे नाम, हा।
दिसे अधिकही तसा गुण तुला असेना महा॥
सदैव भलत्यासही सुलभ, आणखी गायका।
छळी न, न अधोगति क्षणहि दे जगन्नायका॥७५॥

ज्ञानेश्वरकन्या संत श्रीगुलाबराव महाराज त्यांच्या संप्रदायसुरतरू अध्याय २ मध्ये २९२ व २९३ ओव्यांत लिहितात की ''जाणेनि नाम घेता वासनाक्षय। नेणोनि नाम घेता पापमात्रक्षय॥२९२ भ्रमेहि नामाची फल प्राप्ती। येणे अधिक विश्वास वाढला चित्ती। कीं उपासनेहून नामगति। श्रेष्ठ जाहली॥२९३

नामस्मरण सर्व व्याधी बाधा हरण करते, म्हणजेच भूतबाधा नष्ट होते. येथे भूतबाधा याचा अर्थ तीन प्रकारचा आहे. पहिला पिशाचादिकांची बाधा, दुसरा चतुर्विध जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज जीव, प्राणी व देवता ज्यांमुळे आधिभौतिक - म्हणजे जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज या चार प्रकारच्या प्राण्यांपासून होणारे दुःख. देवतांच्या कोपाने अतिवृष्टी, अनावृष्टी इ. सारखी संकटे येऊन होणारे दुःख हे आधिदैविक तर आध्यात्मिक म्हणजे आपल्या वासनांनीच आपणांस होणारे दुःख. आपले मन आपणांस दुःख देते. या सर्व त्रिविध बाधा - आधिभौतिक, आधिदैविक व आध्यात्मिक नामस्मरणाने नष्ट होतात.

मोरोपंत आर्या मंत्रभागवतात अशी आहे :-

''भगवन्नामोच्चारें सकलहि पापे सवासने जळती।

मळती न नामधारक, पळती यमदूत, विघ्नेही टळती ॥''

नामस्मरणाने सर्व संसारदुःख नष्ट होऊन सर्वत्र ईश्वराची अद्वैतसत्ता अनुभवता येते. नामस्मरण करण्याऱ्यास कर्माकर्माची भीती नाही म्हणून काळाचीही नाही. नामस्मरण साधकास इतके निर्भय बनवते की कळिकाळ स्वतःच त्यास शरण येतो असे ''ज्याचे गर्जता पवाडे। कळीकाळ पाया पडे ॥'' संत तुकाराम सांगतात. त्यांनी असेही सांगितले आहे की ''नामस्मरण हे प्रथम साधन जरी असले तरी शेवटी ते साध्यही आहे.''

भागवतात स्कंध १२ अ. ३ मध्ये ५१ व ५२ वा श्लोक असा आहे.

''कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महान गुणः। कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तबंधः परं व्रजेत् ॥५१॥ कृते यद्‌धायतो विष्णुं त्रेताग्रां यजतो मखैः। द्वापारे परिचर्यायां कलौ तत् हरिकीर्तनात् ॥५२॥

कलियुग समस्त दोषांचा महासागर असले तरी सर्व युगधर्माचे फळ एका नामसंकीर्तन साधनाने प्राप्त होणारे नामस्मरण हा त्या कलियुगाचा सर्वोत्तम गुण आहे. संत तुलसीदास त्यांच्या रामायणात लिहितात ''चहुं जुग चहुं श्रुति नामप्रभाऊ । कलि विशेष नहि काम उपाऊ । नहि कलि करम, न भगति विवेकु । रामनाम अवलंबन एकु ॥'' याचा अर्थही तोच आहे.

श्रीधरस्वामी हरिविजय ग्रंथात अ. १६ मध्ये ६ व ७ या ओव्यांत नाममहिमा कथन करतात तो असा : ''नामाग्निने न जळे। ऐसे पाप कोणी नाही केले। वाल्मिके बहु पाप जोडिले। परी नाही उरले नामापुढे ॥६॥ गणिका आणि अजामिळ। इही केले दोष कल्लोळ। परी नामाचे अद्‌भुत बळ। जाळी सकळ क्षणार्धे ॥७॥

नामस्मरणाने भूतकालीन पापे नष्ट होतात. भविष्यातील पापे नष्ट होत नाहीत म्हणून नामस्मरण करणाऱ्याने पुन्हा पाप करू नये. भविष्यात पापवृत्तीच नष्ट करण्यास अखण्ड नामस्मरण करावे. नामाचे माहात्म्य सांगणारे खालील काव्य / ओव्या अशा आहेत.

''समुद्रवलयांकित पृथ्वीचे दान।<br>
करतां समान न ये नामा ॥<br>
म्हणऊनि कोणी न करावा आळस।<br>
म्हणा रात्रंदिवस राम राम ॥<br>
सकळहि शास्त्रे पठन करता वेद।<br>
सरी नये गोविंद नाम एके ॥<br>
सकळही तीर्थ प्रयागादि काशी।<br>
करता नामाशी तुळतीना ॥

श्रीज्ञानेश्वर महाराज ''तरी कीर्तनाचेनि नटनाचे । नासिले व्यवसाय प्रायश्चितांचे । जे नामचि नाही पापांचे। ऐसे केले ॥'' असे लिहितात ते नामाच्या महानतेपायीच.

संत तुकारामांचा नाममहिमा सांगणारा अप्रतिम अभंग येथे देत आहे. तुकाराम नामात किती रंगले होते याचे हा अभंग प्रतीक आहे. अशा अलौकिक नामयोगी संत तुकारामांना सदेह वैकुंठी नेले विठ्ठलाने ते याच नामस्मरणाने, जे त्यांचे जीवन व्यापून राहिले होते. नामस्मरण व नामसंकीर्तन हेच त्यांचे व्रत होते. अभंगात तुकाराम महाराज सांगतात।

''हेचि माझे तप, हेचि माझे दान।

हेचि अनुष्ठान नाम तुझे ॥१॥
हेचि माझे तीर्थ, हेचि माझे व्रत।
सत्य हे सुकृत नाम तुझे ॥२॥
हेचि माझे कर्म, हाचि माझा धर्म।
हाचि नित्यनेम नाम तुझे ॥३॥
हाचि माझा योग, हाचि माझा यज्ञ।
हेचि तप ध्यान नाम तुझे ॥४॥
हेचि माझे ज्ञान, श्रवण, मनन।
हेचि निजध्यासन नाम तुझे ॥५॥
हाचि कुळाचार, हाचि कुळधर्म।
हाचि नित्यनेम नाम तुझे ॥६॥
हा माझा आचार, हा माझा विचार।
हा माझा निर्धार नाम तुझे ॥७॥
तुका म्हणे दुजे सांगायासी नाही।
नामेविण काही धनवित्त ॥८॥

संत एकनाथही असेच प्रतिपादन करतात :
नाम घेता हे वैखरी। चित्त धावे विषयांवरी ॥१॥
कैसा होता हे स्मरण। स्मरणामाजी विस्मरण ॥२॥
नाम रूपा नव्हता मेळ। नुसता वाचेचा गोंधळ ॥४॥
एका जनार्दनी छंद। बोलामाजी परमानंद ॥४॥

नाम घेणे सुलभ आहे. त्यात श्रम नाहीत, वाचेने नुसते उच्चारण करावयाचे, पण श्रद्धा व आवडीने नामस्मरण करणे अत्यंत महत्त्वाचे. संत तुकाराम ''नामाची आवडी तोचि जाणा देव। न धरी संदेह काही मनी ॥ नाम म्हणे तया उरले साधन। ऐसे हे वचन बोलो नये ॥'' असे नामाच्या जोडीला आणखी काही साधन केले पाहिजे असा विकल्प येऊ नये यासाठी लिहितात. कुराणात तसेच ख्रिश्चन धर्मातही नाम व भक्तिमार्ग सांगितला आहे. समर्थ रामदास दासबोध दशक ४ समास ३ मध्ये'' चहुवर्णासी अधिकार। नामी नाही लहान थोर। जड मूढ पैलपार। पावती नामे॥'' असे सांगून नामस्मरण सर्वांसाठी आहे, तेथे कोणताही भेदभाव नाही हे स्पष्ट करतात.

ऋग्वेदाच्या आठव्या मंडलात ''मर्ता अमर्तस्य ते भूरि नाम मनामहे। विप्रासो जातवेदसः।'' असा मंत्र आहे. तसेच ''अस्य जानन्तो नाम चिद्विवक्तनमहस्ते विष्णो सुमतिं भजामहे।'' असा दुसरा मंत्र आहे. या दोन्ही मंत्रांचा भावार्थ आम्ही मरण पावणारे, पण अविनाशी असे जीव तुझे नाम, तप, दान नित्यकर्मादिक सर्व धर्माहून अत्यंत श्रेष्ठ समजतो. स्कंदपुराणातही ''नाम्नोस्ति यावती शक्तिः पापनिर्हरणे हरेः। तावत्कर्तुं च शक्नोति पातकं पातकी जनः॥'' ''सकृदुच्चारितं येन हरिनित्यक्षरद्वयम्। बद्ध परिकरस्तेन मोक्षाय गमनं प्रति'' असे म्हटले आहे.

(या लेखाचा उर्वरीत भाग पुढील अंकात देण्यात येईल.)

**वसंत गोडबोले**
१२४, शनिवार पेठ (नेनेघाट),
पुणे - ४११०३०
भ्रमणध्वनी : ९४२३८५८८२३

●●●

कै. गुंडोपंत हरिभक्त (गोविंद महादेव नवाथे) यांचे १९६४ साली प्रसिद्ध झालेल्या 'वामनाची गोष्ट' या पुस्तकातील पहिले व दुसरे प्रकरण पान क्र. १९ वर छापलेले आहे व ही गोष्ट क्रमशः पुढील अंकात प्रसिद्ध केली जाईल.

- संपादक

... हरि मुखें म्हणा, हरि मुखें म्हणा।
... पुण्याची गणना कोण करी॥ - ज्ञानदेव महाराज

ज्ञानेश्वर महाराजांनी आपल्या सार्थ हरिपाठात जे विवेचन केलेले आहे, ते आजच्या काळालाही सुसंगत ठरत आहे. आदरणीय आहे, अनुकरणीय आहे. भक्तीला सुरुवात करताना प्रथम देवदर्शन घ्यावेच लागते. दैनंदिन व्यापामुळे वा तापामुळे देवदर्शनास देवळात जाणेही शक्य नाही. म्हणतात ना, ''देखल्या देवाला दंडवत''. आपल्या मनात ईश्वराबद्दल श्रद्धा असो वा नसो; पण काही म्हणा, मनुष्य ईश्वरास अप्रत्यक्षरीत्या घाबरून असतो, मनातल्या मनात! कारण ईश्वराचा क्रोध कधी-कसा-कुठे होईल हेही सांगता येणार नाही. जगात चांगले-वाईट आहे, तसेच आस्तिक-नास्तिकही आहेत. माझ्या मते एकमेकांची उणीदुणी काढत वेळ घालविण्यापेक्षा, परमार्थात तो घालविल्यास सार्थकी लागेल, सात्त्विक समाधानही लाभेल, मनातला शीण नाहीसा होऊन लोप पावेल.

संत ज्ञानेश्वरांना, संत एकनाथांना म्हणा, अहो! तो परमेश्वर ''कुणा-कुणात'' दिसला व भावला, तर सर्व सजीव प्राणिमात्रांत व सृष्टीच्या चराचरात आहे! आपण याकडे दुर्लक्ष केले, वा उदासवृत्तीने पाहिले तर आपले दुःख, आपले ताप कसे निघून जाणार! चांगले कर्तव्य-कर्म करून 'जीवनाचे सार्थक' करून घ्या. म्हणतात ना, '' तुटला धागा जरी सुताचा, ना पुन्हा तो जोडता येई, गेला थेंब पाण्याचा, पुन्हा तो मिळत नाही.'' हे सत्य सर्वांस माहीत असताना आपण विवंचनेत व दुःखाच्या गर्तेत का सापडतो?

प्रत्येक धर्मात-पंथात त्यांच्या तत्त्वात अनेक भेद वा प्रवाह असले तरी कोणते 'ग्राह्य' व कोणते त्याज्य हे प्रत्येकाच्या अनुभवावर व आचरणावर अवलंबून आहे. ''जगी सर्व सुखी असा कोण आहे'' हे रामदास स्वामींनी 'मनाच्या श्लोकांत', मनाला विचारलेले आहे. रामदास स्वामींनीं 'मनाचे श्लोक' हे स्वमनाला उद्देशून लिहिलेले आहेत; यात दुसऱ्याला उपदेश करावा ही भावना औषधालाही नाही. आयुष्य जगताना कुणाशीही तुलना करू नका, तुच्छतेने पाहू नका, अवहेलना करू नका! जे घडायचे आहे ते घडणारच आहे म्हणून चिंता-त्रास करून घेण्याचे कारण काय? 'सगुणाची' पूजा करा आणि 'निर्गुणाची' अवहेलना वा विटंबना करा असे कुण्या संतांनी वा धर्मगुरूंनी सांगितलेले नाही. सारांश 'विचारांच्या' मागे सतत धावत असताना नाहक नको ते 'विकार' आपणांस जडतात. 'जीवनात' प्रथम धावपळ करीत कमवावयाचे व सारे आजारपणात घालवायचे! साधे प्रेमाचे चार शब्द आपणांस बोलता येऊ नयेत? त्याला काय पैसे पडतात? साधे दैनंदिन उदाहरण घ्या. आईवडील जिवंत असताना आपण त्यांचा अपमान, कधी छळ करतो, शिव्या-शाप देतो! पण ते ''निवर्तल्यावर'' त्यांचे फोटो भिंतीवर लावून आपण आपले समाधान करून घेत असतो! ज्यांनी आपल्याला जन्म दिला, पुढे

शिक्षण-संस्कार रुजविले, पालनपोषण केले, त्यांचे पांग असेच फेडायचे का? आम्ही ते देवाघरी गेल्यावर त्यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, की कुणाचे अनुकरण करतो हे पाहिले पाहिजे! अपेक्षा ठेवून कुणाकडे पाहू नका, मागू नका! जे आपणांस 'पटत' नाही, 'पचत' नाही त्याच्या भानगडीत पडू नका! जसे अन्न वा औषध तुमचे 'रक्षण' करते 'त्याचे जतन करा, स्मरण ठेवा!' आपल्या हिंदुधर्मात 'भोगापेक्षा', 'त्यागाला' जास्त महत्त्व दिलेले आहे. साधुसंत-आईवडील-गुरुजन 'त्याग' करतात ते कशासाठी, कुणासाठी, याचा विचार व्हायला पाहिजे! अपेक्षेने पाहिले तर अपेक्षाभंग होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

कोणत्याही गोष्टीला कारण असते, ती गोष्ट अकारण घडत नसते! रोग्याला गँगरिन होऊ नये म्हणून, एखादा सर्जन त्याचा पाय धडावेगळा करतो, तर एक 'खुनी', एखाद्याचा हात किंवा पाय 'धडावेगळा' करतो, ह्या क्रिया सारख्या वाटत असल्या तरी यामागे एकाची 'वाचविण्याची' भावना असते, तर दुसऱ्याची 'जीव घेण्याची' भावना (प्रबळ) असते! 'क्रिया' सारख्या दिसल्या तरी 'प्रतिक्रिया' वेगवेगळ्या असतात. वर्गात 'मस्ती' करणारी मुले व रस्त्यावर दंगल करणारी माणसे यांत जमीनअस्मानाचा फरक असतो, 'दंगल' हेतुयुक्त असते, मुलांची मस्ती निर्हेतुक असते. एकांस भविष्यकाळ असतो, दुसऱ्यांचा भूतकाळ झालेला असतो. विचारांना साचेबंदपणा आला की विचाराच्या शिळा (दगड) बनतात. प्रेमात आपण प्रेमाने जवळ घेत असतो, तर दुःखात आपण लोटून देत असतो! पहिल्यात 'भोग' असतो, दुसऱ्यात 'त्याग' असतो.

'निरोगी' मुले शांत-स्वस्थ बसू शकत नाहीत! काही ना काही उद्योग करण्यात दंग असतात. काही वेळेस ती खेळात रमून जातात, न पटल्यास रडत बसतात! त्यांचे 'जग'-'विश्व', निरागस-निरामय असते, त्यांना मध्येच ढवळाढवळ केलेली आवडत नाही! तसेच प्रौढ माणसांचे असते. ''प्रत्येक जन्मलेल्या व्यक्तीला शैशवस्था, बाल्यावस्था, किशोरावस्था, प्रौढावस्था व वृद्धावस्था यांतून जावेच लागते, त्यास पर्याय नसतो, दुसरा मार्ग नसतो! आपले ''वय'' ओळखून प्रत्येकाने वागायचे असते; बोला-चालायचे असते. 'निसर्गाचे' व आपले नाते दृढ करावयाचे असते. शेवटी आपल्याला ''निसर्गाला'' सोडून वा विसरून चालणार नाही. जुने तत्त्ववेत्ते प्रा. प्रोबेल, प्रा. रूसो, प्रा. कार्ल मार्क्स, प्रा. फ्रॉइड इ. इ.चे ऋण आपणांस फेडता येणार नाही, पण विसरता कामा नये. ते जसे मानवी उत्कर्षासाठी झटले-जगले. तसे आपण अल्पसे जगून, त्यांचा आदर व मान राखू या! जगाचे अंतिम 'सत्य' हे अजूनही अनाकलनीय आहे व अस्पर्श आहे, हेच जाताजाता मला सांगावेसे वाटते इतकेच.

**परमानंद मनोहर शेलार**
१/८, त्रिवेणी सदन को. हौ. सो. लि.,
बॉम्बे-पूना रोड, सह्याद्री सो. समोर,
कळवा (प.) - ४००६०५
ठाणे

●●●

कृष्णानं यमुनेच्या त्या डोहाशेजारच्या कदंब वृक्षावरून थेट डोहामध्ये उडी घेऊन कालियाचा असा काही समाचार घेतला की अखेर कालियाच्या स्त्रियांना कृष्णाजवळ कालियाच्या प्राणांची भीक मागावी लागली. कालियानं त्याच्या सर्व कबिल्यासमवेत यमुना नदी सोडून कायमचं दूर पर्वतावर निघून गेलं पाहिजे या अटीवर कृष्णानं त्याला अभयदान दिलं आणि यमुनेचं पात्र इतर मनुष्यप्राण्यांच्या मुक्त वापरासाठी खुलं करून दिलं.

वृंदावनात शरदऋतूचं आगमन झालं. शीतल वारे वाहू लागले. प्राणिमात्र थंडीनं गारठून गेले. सूर्यनारायणदेखील त्या थंडीमुळेच जणूकाही उशिरा उगवू लागला आणि भराभरा आकाशगोलाची मार्गक्रमणा करून लवकरात लवकर क्षितिजापलीकडच्या आपल्या निवासस्थानी लुप्त होऊ लागला. गोपगोपी सालाबादप्रमाणे शक्रोत्सव साजरा करण्याची मोठ्या उत्साहानं तयारी करू लागले.

आश्चर्याची गोष्ट अशी की या त्यांच्या उत्साहावर विरजण घातलं स्वतःच उत्साहाची मूर्ती असलेल्या कृष्णानं! तो नंदासह इतर वरिष्ठ आणि विवेकी गोपांना विचारू लागला, ज्या इंद्राला आपण या उत्सवाच्या निमित्तानं भजतो, पूजतो त्या इंद्रानं कधी या उपासनेची दखल घेतली आहे काय? गोपकुळाला या उत्सवापासून काहीतरी फायदा झाला आहे काय? ज्या रूढीचा कोणासही तिळमात्र फायदा नाही ती आपण केवळ वाडवडील करत आले आहेत म्हणून अथवा इंद्रादिक देवतांच्या, की ज्यांना आपण कधीही पाहिलं नाही, व्यर्थ भयानं का म्हणून करावी?

मी असं म्हणत नाही की आपण निसर्गातल्या उपयोगी शक्तींसमोर नतमस्तक न होता उन्मत्त व्यवहार आचरावा! पण आपल्याला खरंच कोणाचा उपयोग होतोय याचा आपण कधी विचार केलाय का? थोडा विचार करता आपणांला दिसून येईल की जर कोणी गोपांच्या पूजेला खऱ्या अर्थानं पात्र असेल तर तो म्हणजे पर्वतराज गोवर्धन होय! तोच तर आपल्याला आणि आपल्या गोधनाला अन्न, वस्त्र, निवारा पुरवतोय. आपल्याला त्याच्या अंगाखांदयावर सुखेनैव क्रीडा करू देतोय. कोणत्याही मोबदल्याची अपेक्षा न करता एखाद्या मातेप्रमाणे आपले कोड पुरवतोय. मित्रांनो, इंद्रादिक देव, जे आपल्याकडे दुर्लक्ष करून आतापार्यंत नुसतीच स्वर्गीची सुखं भोगण्यात मग्न होऊन राहिले आहेत, त्यांना का पूजता? चला, आतापासून आपण आपल्या खऱ्या देवाला म्हणजेच निसर्गदेवाला पुजू या! त्याच्या चरणी लीन होऊ या!

पापभीरू आणि रुढिप्रिय गोपांना एकीकडे कृष्णाचा युक्तिवाद पटत जरी असला तरी दुसरीकडे त्यांची मनं एका अनामिक भीतीनं भारली गेली होती...

**‘ गोवर्धन गिरिधारी’ जाती नगराज**

भजु या गिरिराजा ॥धृ॥

मित्रांनो कोण कोठिला इंद्र ॥१॥
पाळा का विनाकारणे रूढी ॥२॥
त्यागु अता इंद्राची ही पूजा ॥३॥
काय असा होई अपुला तोटा ॥४॥

त्यापेक्षा गोवर्धन गिरि पूजा ॥५ ॥
देत असे वस्त्रे अन्न निवारा ॥६॥
अपुले जे गोधन ते हा पाळी ॥७॥
वृक्षांची देई शीतल छाया ॥८॥

फलपुष्पे सेवितो किती याची ॥९॥
पशुपक्षी विहार मोदे करिती॥१०॥
धनधान्ये अगणित पिकती साची ॥११॥
जलाशये जीवन आम्हां देती ॥१२॥

मिळत असे यायोगे सुख भारी ॥१३॥
याविण रे कोण अम्हांला त्राता ॥१४॥
यास्तव रे वदतो तुम्हांलागी ॥१५॥
राखू या निसर्गदेवा खऱ्या ॥१६॥

जरि झाला कोपच देवेंद्राचा ॥१७॥
त्या समयी गोवर्धन करि रक्षा ॥१८॥
यालागी सांगे मी विनवूनी ॥१९॥
ऐकावे बोल अजी प्रेमाचे ॥२०॥

वृंदावनात त्या वर्षी इंद्राच्या ऐवजी पूजेचा मान गोवर्धन पर्वताला मिळाला. यामुळे क्रोधायमान झालेल्या इंद्रानं गोपांवर पर्जन्यास्त्र सोडलं. अखंड कोसळत असलेल्या पावसानं वृंदावनवासीयांचं जगणं अशक्य करून टाकलं. असहाय गोप एकीकडे कृष्णाला बोल लावू लागले, पण दुसरीकडे या संकटातून सुटकाही करण्याची विनंती करू लागले. कृष्ण सर्वांना धीर देत म्हणाला, गडे हो, हडबडू नका, गडबडू नका, तुमच्या अंतरात्म्याने दिलेल्या कौलावर विश्वास ठेवा, विचारशक्तीवर विश्वास ठेवा, कार्यक्षमतेवर विश्वास ठेवा. एवढं जर तुम्ही केलंत तर कोणतंच संकट संकट राहणार नाही. ज्या गोवर्धन पर्वताची तुम्ही मनोभावे पूजा केलीत तोच गोवर्धन तुम्हांला याही संकटातून वाचवल्याशिवाय राहणार नाही. फक्त आपण आपल्या बाजूनंही थोडा प्रयत्न करू या. चला तर! नेहमीसारखा मी तुमच्याबरोबर आहेच!

कृष्णासहवर्तमान सारे मग गोवर्धनाच्या पायथ्याशी गेले. तिथे कृष्णानं सर्वांना गोवर्धन उचलून आपल्या डोक्यावर छत्रासारखा धरण्याची आज्ञा दिली. सर्वांनी नेटानं गोवर्धन उचलला आणि आपापल्या कुटुंबकबिल्याला त्या छत्राखाली आणलं. कृष्ण हसत म्हणाला, पाहा तर! हे संकट निवारण्यासाठी तुम्ही मला बोलावलंत, पण शेवटी स्वतःच पर्वत उचलून आपलं रक्षण केलंत. मला तर त्या पर्वताला फक्त एका बोटाचाच टेकू काय तो द्यावा लागतोय. ह्यावर किंचित लज्जित होऊन गोप म्हणाले, कृष्णा, वृथाच आम्ही तुला बोल लावत होतो. पण ह्याही संकटातून तू आमच्यासवे नसतास तर आम्ही वाचतो ना!

पाऊस अखंड आठ दिवस कोसळून दमला आणि थांबला. सारे गोपगोपी लगेचच वृंदावनात परत आले. पावसानं केलेलं नुकसान नव्या दमानं त्यांनी भरून काढलं आणि काही झालंच नाही अशा थाटात परत संसाराला सुरुवात केली.

दरम्यान देवर्षी नारदांनी कंसाची भेट घेऊन कृष्ण हाच देवकीचा आठवा पुत्र असल्याची

कंसाची खातरजमा करून दिली. कंसानं मग आपल्या हाताखालील केशी नावाच्या आणखी एका असुराला कृष्णवधासाठी वृंदावनात धाडलं. एका अतिशय उन्मत्त आणि शक्तिशाली अश्वाचं रूप धारण करून केशी कृष्णावर सर्व सामर्थ्यानिशी धावून गेला, त्याला चावायचा प्रयत्न करू लागला. पण कृष्णानं आपला हात सरळ त्याच्या जबड्यात खोलवर घालून त्याचा श्वास कोंडायला सुरु वात केली. अखेर भयंकर दुगाण्या झाडत केशीनं प्राण सोडले.

आपल्या हाताखाली असलेल्या एकाहून एक महाबलाढ्य असुरांची कृष्णापुढे डाळ शिजत नाहीशी पाहिल्यावर कंसाची अवस्था मोठी अनिर्वचनीय झाली. निराशा, क्रोध, भय आदी भावनांनी कंसाला अन्न गोड लागेनासं झालं, झोप येईनाशी झाली. ही ब्याद एकदा कायमचीच मिटवून कशी टाकावी हा एकच विचार आता त्याला रात्रंदिवस सतावू लागला...

**प्रसाद दि. औटी**
न्यू अजंठा अव्हेन्यू, बि. नं.३ बी.-१,
६ वा मजला, ब्लॉक नं. १८,
पौड रोड, कोथरूड, पुणे - ४३३ ०३८
दूरध्वनी : ०२०-२५४५००८९
मोबाइल : ९८८११०४०७४

●●●

(पृष्ठ क्र. ४ वरून...**संस्कृत सुभाषितांचे अंश व समानार्थी म्हणी, वाक्प्रचार**)

(आशेने) ते धावत सुटतात, ह्या साखळीतून जो मुक्त असतो तो पांगळ्यासारखा स्थिर राहतो.

**विकृतिं नैव गच्छन्ति दुष्टसंगेन साधवः।**[२९८]
सज्जन (क्षणैक) दुष्टांच्या संगतीत आले तरी त्यांच्यावर त्यांचा काहीही परिणाम होत नाही (कारण सज्जन ते सज्जनच).

**आवेष्टितो महासर्पैः चन्दनः किं विषायते?॥**
चंदनाच्या झाडाला मोठ्या विषारी सापांनी विळखे घातले तरी ते झाड विषारी होते काय? (विषायते - नामधातू)

**इन्द्रोऽपि लघुतां याति, स्वयंप्रख्यापितैः गुणैः।**[२९९]
स्वतःच स्वतःची महती सांगायला लागला तर इंद्रासारख्या देवांच्या राजाला पण कमीपणा येतो.

**परैः प्रोक्ता गुणा यस्य, निर्गुणोऽपि गुणी भवेत्!** दुसऱ्याने आपल्या गुणांची वाहवा केली पाहिजे. अशा वेळी सामान्य गुण असलेला मनुष्यपण गुणवान ठरेल.
हिंदी म्हणः **अपने मुँह मियाँ मिठ्ठू बनना।**
**(तथा) पुरुषकारेण विना दैवं न सिध्यति।**[३००]
पराक्रमाशिवाय लक्ष्मी वश होत नाही

**यथा होकेन चक्रेण रथस्य गतिर्न भवेत्।**
एका चाकाने रथ चालू शकणार नाही (नुसते नशिबावर अवलंबून चालणार नाही - असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी).
No pains, no gains.

इति शम्। क्रमशः

**दि. दा. औटी**
शिवकृपा, घर नं. ७३,
मु. पो. मुद्रे खुर्द, ता. कर्जत,
जि. रायगड - ४१० २०१
दूरध्वनी : ०२१४८-२२११०९
मोबाइल : ९४२००५९५७४

**'मातोश्री, दोन पुरेत'**

''ॐ भवति भिक्षान्देहि।''

पर्णकुटीच्या दारातून आलेली ही हाक ऐकून लोपामुद्रेने आतूनच ''बाळ, आले हं'' असे मोठ्याने म्हटले आणि हातात अन्नाचे पात्र घेऊन, ती घाईघाईने बाहेर आली.

ती हाक देणारा बटु, हातात भिक्षापात्र घेऊन, दारातच उभा होता. तो दृष्टीस पडताच लोपामुद्रेचे मान हरपले आणि ती बटूकडे डोळे भरून पाहू लागली. बटूची ती लहान गोंडस मूर्ती पाहून कोणाचीही तीच अवस्था झाली असती. त्याचे सारे अवयव रेखीव व सुंदर होते. कांती सतेज असून मुख प्रफुल्लित होते. डोळे तर पुंडरिकासारखे तेजस्वी होते.

त्याच्या गळ्यात रुद्राक्षमाळा व यज्ञोपवीत आणि कंबरेला दर्भाची मेखला होती. हातांत भिक्षापात्राबरोबरच त्याने आपला दंडही धरला होता.

बटूने स्मित करीत त्या ऋषिस्त्रीकडे पाहिले व हातातील भिक्षापात्र तिच्यापुढे केले. तेव्हा ती भानावर आली आणि आपल्या पात्रातील अपूप त्याच्या भिक्षापात्रात घालू लागली. ते घालीत असता ती बटूला अत्यंत मृदू वाणीने म्हणाली ''बाळा, तुझी वाटच पाहात होते. आज अपूपाचा नैवेद्य आहे हं.'' हे ऐकून बटूने पुन्हा स्मित केले आणि पात्रात दोन अपूप पडताच तो लोपामुद्रेला विनयाने म्हणाला, ''मातोश्री, दोन पुरेत.''

त्यावर लोपा म्हणाली, ''बाळा, बघ. ते तुझ्यासारखेच लहान लहान आहेत. आणखी एक घालते!'' बटूने हसत मधुर वाणीने उत्तर दिले, ''नको. दोनच पुरे झाले.'' अवश्य असेल त्यापेक्षा बटू अधिक घेत नसतो हे लोपामुदेला अर्थातच ठाऊक होते. म्हणून अधिक आग्रह न करता ती बटूला म्हणाली, '' बाळ, पुन्हा लौकर ये हं.'' नेत्रांनीच आपले समाधान व्यक्त करीत बटूने लोपामुद्रेला नमस्कार केला. ''आयुष्मान हो'' असा तिने आशीर्वाद दिला.

बटू लगेच मागे फिरला आणि आपल्या वाटेला लागला. लोपामुद्रा बराच वेळपर्यंत त्याच्यामागे टक लावून पाहत उभी राहिली. तिच्या नेत्रांत वात्सल्यभाव पूर्णपणे ओसंडत होता. बटू दिसेनासा झाल्यावर, 'पृश्नी, असला पुत्र तुला लाभला; बाई, धन्य आहेस तू,' असे उद्गार त्या ऋषिस्त्रीच्या तोंडून सहजच बाहेर पडले आणि मग ती प्रमुदित चित्ताने पुन्हा आपल्या गृहकृत्याला लागली.

लोपामुद्रेच्या पर्णकुटीतून मधुकरी घेऊन गेलेला हा बटू म्हणजे अन्य कोणी नसून, बलिराजाने हातावर तीन पावले भूमीच्या दानाचे उदक सोडले असता ज्याने केवळ आपल्या दोनच पावलांनी सारे विश्व व्यापून टाकले व तिसरे पाऊल ठेवण्यासाठी त्या गर्विष्ठ राजाला आपल्यापुढे मस्तक नमविण्यास लावले तो भगवान विष्णूचा अवतार असलेला बटू वामनच होय. त्याची ती हृदयंगम कथा वाचण्यापूर्वी प्रथम आपण त्याच्या

जन्माआधीची हकिकत पाहू. तीही अत्यंत रमणीय आहे.

फार फार प्राचीन काळी दक्षिणापथ देशात नर्मदेच्या तीरी एक सुंदर तपोवन होते. वड, पिंपळ, शाल, कदंब, अशोक वगैरे उंच उंच वृक्षांच्या छायेत ते तपोवन शीतळ भासे. त्याच्या विस्तीर्ण पटांगणातून हरिणांचे लहानमोठे कळस निर्भयपणे बागडत असत. तपोवनात एक लहानसे सरोवर होते. त्यात नाना रंगांची कमळे फुलली म्हणजे तर तेथील वनश्री अधिकच रम्य दिसे. अशा त्या सुंदर तपोवनात काश्यप ऋषीचा प्राचीन आश्रम होता. आश्रमाच्या शिरोभागी ऋषीची यज्ञशाला होती. तिच्या मधोमध एक प्रशस्त यज्ञकुंड होते. त्यातील अग्नी सदा प्रज्वलित असे. यज्ञशालेत एका बाजूस दर्भ आणि समिधांचे ढीग, कृष्णाजिनांच्या चळती, तसेच जुहू, स्रुवा, चमस, प्राशित्र इत्यादी अनेक यज्ञपात्रे आणि तुपाचे व पाण्याचे मोठमोठे कलश ठेवलेले होते.

यज्ञशालेच्या दुतर्फा लांबच लांब दालने होती. तेथे कृष्णाजिने मांडून त्यांवर वेदपठणासाठी छात्रगण बसत असत.

यज्ञशालेच्या मागील बाजूस थोड्या अंतरावर शे-दीडशे धेन राहतील एवढी मोठी गोशाला होती. तपोवनांत ठिकठिकाणी लहान लहान पर्णकुट्या होत्या. त्यांत आश्रमातील छात्रगण राही. यज्ञशालेला लागूनच असलेल्या पर्णकुटीत स्वतः कुलगुरू काश्यप ऋषी राहत होता. दारात अशोकाचे एक उंच झाड होते. त्याला पार बांधलेला होता.

आज दोनप्रहरी सर्व आन्हिक आटोपल्यावर काश्यपी ऋषी त्या पारावर झाडाला टेकून बसला होता. त्याच्या मनात विचारांचे काहीतरी काहूर माजलेले असावे असे त्याच्या खिन्न मुद्रेवर स्पष्ट दिसत होते बराच वेळ काश्यप एकटाच बसला होता. नंतर त्याची भार्या, पृश्नी, आपले गृहकृत्य आटोपून तेथे आली. पतीची खिन्न मुद्रा पाहून तिच्या तेजस्वी डोळ्यांत दोनच आसवे उभी राहिली. पतीच्या ध्यानात येणार नाही अशा प्रकारे तिने ती आपल्या पदराने झटकन पुसली आणि पतीच्या जवळ येऊन ती म्हणाली, ''महाराज, आज आपण भारीच खिन्न दिसता. काय झालं बरं?''

काश्यप जड अंतःकरणाने तिला म्हणाला, ''भार्ये, आज आषाढ लागला. आणखी पंधरा दिवसांनी गुरु पौर्णिमा...'' हे म्हणत असता त्या ऋषीचा कंठ सद्गदित झाला. त्याच्याने पुढे बोलवेना. गुरुपौर्णिमेच्या दिवसाचे सारे चित्र त्याच्या डोळ्यांसमोर उभे राहिले.

गुरुपौर्णिमा आली की दहा-पंधरा दिवस आधीपासून आश्रमात धावपळ सुरू होत असे.

पौर्णिमेला मोठा होम होई. अगणित पाहुणे येत. त्यासाठी सारे छात्र रानात जाऊन दर्भ, समिधा, काष्ठे तसेच कंद, मुळे, फळे इत्यादींचे ढीगच्या ढीग गोळा करून आणीत. गुरुपूजेचा उत्सव थाटाने साजरा व्हावा म्हणून प्रत्येक जण अहमहमिकेने कंबर कसून कामाला लागे. अवघा आश्रम नवचैतन्याने फुलून जाई. पण आज काय स्थिती होती? विरोचनपुत्र दैत्यराज बलीने अवघ्या दक्षिणापथावर आपली सत्ता प्रस्थापित केली

होती. बापाप्रमाणेच बलिराजाही पाखंडमताचा पुरस्कर्ता होता.

ईश्वराचे अस्तित्व आणि वेद त्याला मान्य नव्हते. देह म्हणजेच सर्वस्व. तेव्हा देहाच्या सुखाचा विचार करण्यातच आयुष्याची इतिकर्तव्यता आहे असे तो मानी.

गुरू शुक्राचार्यांच्या आशीर्वादाने बलिराजाला अनेक सिद्धी प्राप्त झाल्या होत्या. त्यांच्या जोरावर तो प्रजेला नित्यशः नवीनवी सुखोपभोगांची साधने उपलबध करून देत असे. त्यामुळे प्रजेला विषयोपभोगांची चटक लागून, तीही त्याच्याप्रमाणेच देहपूजक बनली होती.

खच्चून धन संपादावे; खावे, प्यावे, नटावे आणि मौज करावी; ह्यापलीकडे दुसऱ्या कशाचाही विचार त्यांना नकोसा झाला होता.

मग अशा ह्या भोगप्रधान राजवटीत लोकांच्या मनात वेदांबद्दल पूर्ण अनास्था निर्माण होऊन कोणीही आपली मुले वेदाध्ययनासाठी ऋषींकडे धाडीनासे झाले तर त्यात नवल ते काय?

त्यामुळे ऋषींचे आश्रम साहजिकच आता ओस पडले होते. नाहीतर काश्यप म्हणजे केवढा नामांकित ऋषी! त्याचा आश्रम छात्रांनी नेहमी गजबजलेला असायचा. जागा नाही म्हणून कैक विद्यार्थ्यांना परत जावे लागे. पण आज त्याच काश्यपाच्या आश्रमात एकही छात्र शिल्लक नव्हता! अशा परिस्थितीत गुरुपूजेच्या उत्सवाच्या जुन्या आठवणी झाल्या असता काश्यपाने खिन्न होऊ नये तर काय करावे?

पतीच्या मनाची झालेली ही स्थिती पृश्नीच्या लागलीच ध्यानात आली. त्याला धीर देत ती म्हणाली, ''नाथ, आपली भगवंतावर निष्ठा आहे ना? तोच आपली चिंता दूर करील.''

भार्येचे हे धीराचे भाषण ऐकून काश्यपाला थोडे हलके वाटले. तो म्हणाला, ''पृश्नी, तू म्हणतेस तेच खरं आहे. आपल्या हाती काय आहे?''

इतक्यात त्याच्या मनात एक नवीन विचार आला. त्याची मुद्रा किंचित उल्हसित झाली आणि तो पृश्नीला म्हणाला, ''मला वाटतं, काही काळ तपश्चर्येत घालविता आला तर मनाला तेवढीच शांतता लाभेल. पृश्नी, सांग. तुला काय वाटतं?''

ह्यावर पृश्नी लगेच म्हणाली, ''प्रभो, आपल्याला बरं वाटणार असेल तर आपण तपश्चर्येला अवश्य जावं. इथली काळजी करू नये. मी आश्रम संभाळीन.''

हे ऐकून काश्यपाला संतोष वाटला. तो पृश्नीला म्हणाला, ''भद्रे, मला त्याची खात्री आहे. तर मग उद्या पहाटेसच निघावं म्हणातो. निघू ना?''

पृश्नीने मानेनेच आपली संमति दर्शविली. पण पतीचा काही काळ वियोग होणार ह्या विचाराने तिचे अंतःकरण आता जड झाले. त्यामुळे तिच्या तोंडून शब्द उमटेना.

तिला थोडे हलके वाटावे म्हणून काश्यप म्हणाला, ''पृश्नी, फाल्गुनात प्रतिपदेपासून बारा दिवस नुसत्या दुधावर राहून तू आपला वेळ भगवान विष्णूच्या पूजेअर्चेत घालव. ह्या पयोव्रताने तुझ्या चित्ताला समाधान लाभेल.''

पतीने पयोव्रत करण्यास सांगितलेले ऐकून पृश्नीला अकल्पित आनंद झाला व ती म्हणाली, ''होय, महाराज, मी हे व्रत अवश्य करीन.'' नंतर दुसऱ्या दिवशी पहाटेस काश्यप ऋषी भार्येचा निरोप घेऊन तपश्चर्या करण्याकरिता अमरकंटक पर्वतावर जाण्यासाठी निघाला.

पृश्नीने मन घट्ट करून जाण्याची अनुमती दिली होती खरी, पण खरोखरीच तो आश्रमाच्या बाहेर पडलेला पाहताच तिला एकदम रडू कोसळले. पण तपश्चर्येमुळे पतीच्या चित्ताला शांती लाभणार आहे ह्या विचाराने तिने स्वतःचे सांत्वन केले आणि मग ती हळूहळू आपल्या नित्याच्या व्यवसायाला लागली.

## 'माझा चरू देवाच्याच मुखी'

काश्यप ऋषी आश्रमात नसल्यामुळे पृश्नीलाही आता उदास वाटू लागले. आपली खिन्नता घालविण्यासाठी म्हणून तिने स्वतःला गृहकृत्यांत गुंतवून घेतले. तिन्ही त्रिकाळ ती अग्नीची निगा ठेवी आणि त्याला आहुती देई. तिच्याजवळ भगवान श्रीविष्णूची एक सुंदर चिमुकली मूर्ती होती. तिची ती रोज मनोभावाने पूजा करी. तिच्या दारातून कोणीही अतिथी विन्मुख होऊन परत जात नसे. ती साऱ्यांची विचारपूस करी. दीन, अपंग तर तिला पृश्नीमाता म्हणत. त्यांना तिचा केवढा आधार वाटे!

पतीच्या अनुपस्थितीत गृहस्थाश्रमाचे योग्य प्रकारे पालन करण्यात त्या पतिव्रतेचे दिवसांमागून दिवस जाऊ लागले. तपश्चर्येने पतीच्या चित्ताला शांती लाभावी म्हणून ती रोज भगवंताजवळ प्रार्थना करीत असे.

वास्तविक पाहता पृश्नी म्हणजे केवढी धीराची बाई. पण कितीही धीराची झाली तरी अखेर ती स्त्रीच. पतिवियोगामुळे आलेल्या खिन्नतेचा ठसा तिच्या चर्येवर स्पष्टपणे उमटलेला दिसू लागला. वरवर पाहणारालाही पृश्नी आता केविलवाणी भासू लागली.

काश्यप ऋषी तपश्चर्येला गेला, त्याला आता पाच-सहा महिने होत आले. एके दिवशी नित्याप्रमाणे पृश्नी यज्ञशालेत सकाळच्या वेळी अग्नीची निगा ठेवीत होती.

पर्णकुटीच्या दाराशी एक वृद्ध याचक आला. भिक्षेसाठी त्याने हाक दिली. यज्ञशालेतून पृश्नीने, ''थांबा हं, आले मी,'' म्हणून उत्तर दिले आणि अग्नी नीट करून यज्ञशालेच्या मागील बाजूने ती पर्णकुटीच्या दाराशी याचक उभा होता तेथे घाईघाईने आली.

पाहते तो याचक वार्धक्याने जर्जर झालेला असून चालण्याच्या श्रमांमुळे थकला आहे. उभे राहण्याचेही प्राण न उरल्याने तिच्याकडे पाहताना त्याचा झोक गेला.

पृश्नीने त्याला लागलीच सावरले, जमिनीवर नीटपणे निजविले आणि धावत आत जाऊन ती भांड्यातून पाणी घेऊन आली. तिने झटकन ते याचकाच्या डोळ्यांना लावले. याचक हळूहळू शुद्धीवर येऊ लागला.

त्याचे पोट भकाळीला गेले होते. भुकेने ह्याचे प्राण व्याकूळ झाले आहेत हे तिने तत्काळ ओळखले. आत जाऊन ती लगेच थोडे दूध घेऊन आली आणि तिने ते त्याला हळूहळू पाजले. दूध पोटात जाताच तो वृद्ध याचक सावकाश उठून

बसला. पृश्नीने आतून एक दर्भासन आणले आणि त्यावर भिंतीला टेकवून तिने त्याला बसविले.

याचकाला आता थोडी हुशारी वाटू लागली होती. जमिनीकडे पाहतच तो कष्टाने बोलू लागला. पण पृश्नीने त्याला बोलू दिले नाही. ती त्याला म्हणाली, ''बाबा रे, तू भुकेला आहेस. खरं ना?''

पृश्नीचे हे ममतेचे शब्द कानी पडताच याचकाच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहू लागल्या. दम खात खात तो म्हणाला, ''होय मुली, बारा दिवस झाले. मी उपाशी आहे. अन्नाचा एक कणही...''

पण याचक पुढे काय बोलत आहे ते ऐकण्यास पृश्नी तेथे उभी राहिली नाही. ती त्वरेने आत गेली आणि अग्निनारायणाला आहुती देण्यासाठी तयार केलेल्या चरूचे पात्र घेऊन घाईघाईने बाहेर आली. अंगणातील एका केळीचे पान तिने झपाट्याने तोडले, ते याचकापुढे ठेवले आणि पात्रातील अन्न त्याच्यावर वाढून तिने याचकाला जेवण्यास सांगितले.

अन्न पोटात जाताच याचकाला चांगली हुशारी वाटू लागली. तो पृश्नीला कृतज्ञतापूर्वक म्हणाला, ''मुली, तू आज मला जीवदान दिलंस. मी तुझे उपकार कधीही विसरणार नाही...'' हे शब्द बोलत असता याचकाने मान वर करून पृश्नीच्या तोंडाकडे प्रथमच पाहिले. तिची खिन्न मुद्रा पाहून तो एकदम दचकला आणि पृश्नीला आर्ततेने म्हणाला, ''मुली, तू अशी खिन्न का? काही संकटात का आहेस?''

याचकाचे भाषण ऐकून इतके दिवस गिळून टाकलेल्या पतिवियोगाच्या दुःखाचा एकदम स्फोट झाला आणि पृश्नीच्या डोळ्यांवाटे घळघळ अश्रुधारा वाहू लागल्या. दुःखाचा आवेग थोडा ओसरल्यावर ती याचकाला म्हणाली ''बाबा रे, काय सांगू तुला? दैत्यराज बळीच्या राजवटीत वेदाध्ययन बंद झाल्यामुळे सारा आश्रम ओस पडला आहे. वेदाध्ययन करणारा एकही छात्र आता हाती नाही. वेदाध्ययन असंच बंद राहिलं तर अखेर काय होईल ह्या चिंतेने माझे पती ग्रस्त झाले असून चित्ताला थोडी शांती मिळावी म्हणून सध्या तपश्चर्येला गेले आहेत. त्यांच्या काळजीने...''

पण आता पृश्नी कंठ पुन्हा एकवार दाटून आला. तिच्याने पुढे बोलवेना.

तिची ती अवस्था पाहून याचक म्हणाला, ''मुली, नको बोलूस. आलं माझ्या ध्यानात...''

आता याचकाचाही कंठ सद्गदित झाला. तो अडखळत अडखळत म्हणाला, मुली, आज इतके दिवस मी उपाशी होतो त्याचंही कारण बलिराजाच आहे. लोक पाखंडी बनल्यामुळे माझी उपासमार होत आहे. माझी कुळकथा कोण ऐकणार!'' असे म्हणून याचकाने दीर्घ उसासा टाकला. क्षणभर तो गप्प राहिला. त्याच्या मनात कसल्यातरी विचारांचा क्षोभ होत असून तो ते प्रयासाने दाबून टाकीत आहे असे त्याच्या मुद्रेवरून स्पष्टपणे दिसत होते.

त्याने आवंढा गिळला. आता त्याच्या मनाचा काहीतरी निश्चय झाला असल्याचे त्याच्या गंभीर मुद्रेवरून दिसत होते.

पृश्नीला धीर देत तो म्हणाला, ''मुली, काळजी करू नकोस. भगवान विष्णू आपल्या

पाठीशी आहे. त्याच्यावर निष्ठा असू दे,'' असे म्हणून याचकाने एकवार पृश्नीच्या तोंडाकडे पुन्हा पाहिले आणि लगेच ''येतो आता,'' असे म्हणून त्याने पाठ फिरविली आणि झपाझप पले टाकीत तो आश्रमाच्या बाहेर पडला.

पृश्नी त्याच्याकडे आश्चर्याने पाहतच राहिली. तिच्या मनात आता विचरांमागून विचार येऊ लागले. ती स्वतःशी म्हणाली, 'थोड्याच वेळापूर्वी उभं राहण्याचंही त्राण नसलेल्या ह्या याचकाच्या अंगी झपाझप चालण्याइतकी ही ताकद एकदम कोठून आली? खास, हा कुणी सामान्य याचक नव्हे. मग हा कोण असेल?'

याचक आता दृष्टिआड झाला होता. त्याचे भाषण आठवीत ती म्हणाली, 'आपण बारा दिवस उपाशी असल्याचं तो म्हणत होता. मला बारा दिवसांच्या पयोव्रताची आठवण करून देण्याठी तर हा कुणी इथे आला नव्हता ना?'

तिचे विचार आता भरधाव जात होते. आणखी आठवण होऊन ती म्हणाली, 'लोक पाखंडी बनल्यामुळे आपली उपासमार होत असल्याचही तो म्हणत होता. तेव्हा हा कुणी देव तर नसेल ना?' हा विचार मनात येताच ती एकदम हसली आणि स्वतःशीच पुढे म्हणाली, 'काय मी वेड्यासारखी विचार करीत बसले आहे? तो कुणीही असो. अतिथी हा देवच असतो. माझा चरू देवाच्याच मुखी पडला आहे.'

हे म्हणत असता नकळतच पृश्नीने आपले दोन्ही हात जोडून केव्हाच दृष्टिआड झालेल्या त्या अतिथीला वंदन केले. (क्रमशः)

**कै. गुंडोपंत हरिभक्त**

(पृष्ठ क्र. ७ वरून...**कौटिलीय अर्थशास्त्र**)

तिबेटी पंडित तारानाथाच्या 'बौद्ध' धर्माचा इतिहास या ग्रंथातील उल्लेखानुसार चाणक्य दीर्घायुषी होता. चंद्रगुप्ताने राजसंन्यास घेतल्यावर, चंद्रगुप्ताचा पुत्र बिंदुसार यालाही त्याने मार्गदर्शन केले. बिंदुसाराचा तो राजगुरू आणि महामंत्री होता, असे म्हटले आहे.

आपल्या बुद्धीवर प्रगाढ विश्वास असणाऱ्या या निर्मोही, क्रांतदर्शी, ऋषितुल्य कौटिल्याने एकच मागणे ईश्वराकडे मागितले आहे ते म्हणजे बुद्धिवैभवाचे. मुद्राराक्षस नाटकातील बुद्धीचे मागणे मागणारा चाणक्याच्या मुखातील हा श्लोक प्रसिद्ध आहे.

'ये याता किमपि प्रधार्य हृदये पूर्वं गता एव ते
ये तिष्ठन्ति भवन्तु तेऽपि गमने कामं प्रकामोद्यमाः।
एका केवलमेव साधनविधौ सेनाशतेभ्योऽधिका
नन्दोन्मूलन दृष्टवीर्यमहिमा बुद्धिस्तु मा गान्मम॥

मनाशी काहीतरी ठरवून जे अगोदर गेले आहेत ते कायमचेच गेले आहेत. जे राहिले आहेत त्यांना पुढे जाण्याचा खटाटोप मोकळेपणाने करु दे. सिद्धी मिळवण्यासाठी जी एकटी शेकडो सैन्यांहूनही अधिक शक्तिशाली आहे आणि नंदाचा निःपात करण्यात जिच्या पराक्रमाचा महिमा जगजाहीर झाला आहे, ती माझी बुद्धी मात्र न जावो.

**डॉ. सौ. वैशाली जयंत दाबके**
३०२, मित्तल पार्क टॉवर २,
रघुनाथ नगर, तीन हात नाका,
ठाणे - ४०० ६०४

सामान्य प्रापंचिकाने संसार करत असताना, नामाचा आधार घेताना कोणती पथ्ये पाळावी? ईश्वरानेच निर्माण केलेल्या मनोविकारांचा त्यांना विषयापासून वळवून, त्यांचे दास न होता त्यांनाच दास करून परमार्थ साधण्यासाठी त्यांचा कसा उपयोग करून घ्यावा? एकंदरीत, संसार राजविद्येच्या युक्तीने करून प्रपंच यशस्वीरितीने पार पाडत असताना परमार्थही साधून या जन्मात मोक्षमार्गावर प्रगती कशी करावी, या संदर्भात सयुक्तिक असलेली काही बोधवाक्ये :

१) वस्तुभोगातील वासना आपण ईश्वराकडे वळवावी, आपल्या प्रत्येक कृतीत ईश्वराचे अधिष्ठान ठेवावे म्हणजे आपण कर्मबंधातून मुक्त राहतो.

२) आल्या गेल्या अतिथीस ‘मी अकर्ता’ या भावनेने भगवंताचे नाम घेऊन अन्नदान करावे, म्हणजे भगवंत प्रसन्न होऊन आपल्याला त्याची कृपा लाभते. अतिथिधर्म या रितीने पाळावा.

३) निर्गुण परमात्म्याकडे पोहोचण्यासाठी, सगुण भक्तीच्या मार्गाने नेणारे ‘नामा’चे शीघ्र वाहनच संतांनी आम्हांस दिले आहे; हे त्यांचे आमच्यावर केवढे उपकार आहेत!

४) परमेश्वराकडे त्याची कृपा न मागता, वस्तुभोग मागणे म्हणजे जेथे कामधेनू मिळते, तेथे गाढव मागण्यासारखे आहे.

५) भगवंताची कृपा ही कामधेनूसारखी आहे, ती मिळाली की सर्व काही आपलेच आहे.

६) बहुत ग्रंथ नि पंथ निर्मिती भ्रम मानसीं।
ठेवावी तरि श्रद्धा ती गीतेवर अनन्यचि ॥

७) फक्त संकटातच आम्हांला तुझी आठवण होणार असेल तर आम्हांला निरंतर संकटातच ठेव म्हणजे आम्हांला तुझा विसर कधीच पडणार नाही, असेच कुंती कृष्णाजवळ मागते.

८) जे समाजात हिंसाचार करतात, गरिबांना नाडतात, अशा समाजशत्रूंची हिंसा (हत्या) ही खरी अहिंसाच होय, कारण त्याने भविष्यात होणारी हिंसा वाचते.

९) प्रारब्ध जे उभे राही पूर्वकर्मानुसार जे।
टाळू शके न कोणी ते तो महेश्वरही तसे ॥

१०) प्रपंचातील संकटांना तोंड देण्याचे धैर्य न राहिल्यामुळे केवळ पलायनवृत्तीने कुटुंब ालनाची जबाबदारी टाळणे म्हणजे ‘वैराग्य’ नव्हे, तर उलट कर्तव्यच्युत झाल्याचे ते मोठे पापच होते.

११) ईश्वराच्या सेवेतून सुटला तो कर्माने बद्ध झाला आणि ईश्वराच्या सेवेत जो बांधला तो खऱ्या अर्थाने मुक्तझाला, असे समजावे.

१२) जिथे नाम जिथे भक्ती श्रीकृष्ण ही वसे तिथे।
तिथे शान्ति समाधान दिव्यानुभव निश्चयें ॥

१३) मी कर्ता या भावनेने कर्मे केल्याने त्यांची बरीवाईट फळे आपल्याला भोवतात व आपण कर्मबंधनात अडकले जातो.

१४) धन-सत्तेचा अभिमान, धन-सत्तेने पार न करता येण्यासारखे संकट आल्यानंतर विरू शकतो, पण सत्कर्म व साधनेचाच झालेला अभिमान जाणे फार कठीण, त्यासाठी गुरूचीच मदत घ्यावी लागते.

१५) प्रारब्ध संकटे येती पूर्वकर्मानुसार जी।
अशक्य टाळणे पूर्ण संत देवांसही तशी॥

१६) प्रापंचिक नियत कायात तत्पर असून, नामाने ईश्वराशी नित्य जोडलेला राहतो, तोच खरा परमार्थसाधक म्हणावयाचा!

१७) देवाजवळ वस्तुभोग मागू नयेत; तर वस्तुभोगाविषयी वासनाच होऊ नये हेच मागावे. देवाजवळ जर कोणती वस्तू मागावयाची असेल तर त्याची कृपाच मागावी.

१८) नामसाधनेने हृदयातील कूटस्थ आत्मारामाचा अनुभव आला की जीवनाचे खरे सार्थक झाले असे निःशंक समजावे.

१९) प्रपंचात वस्तुभोग मिळविण्याच्या प्रक्रियेत ईश्वराचे अधिष्ठान ठेवले, तर त्यापासून मिळणारे सुरू सात्त्विक व उपाधीविण असते म्हणून ते दुःखान्तिकट्टी होत नाही.

२०) परमेश्वर भक्तचे रक्षण करण्यास नेहमीच तयार असतो, परंतु भक्ताची अनन्यभावाची आर्त हाक त्याला पोहोचते तेव्हाच तो साहाय्यास धावून येतो. यासंबंधात द्रौपदी कृष्णाचे संवाद पाहा तो सहा श्लोकात असा आला आहेः

द्रौपदी म्हणते -

फेडिता वसने माझी पुरवीलीस अंतरी।
रक्षण्या लाज माझी तू जेव्हा आलास धावुनी॥१॥

केसांनी परि खेंची म्या दुःशासन सभागृही।
धावलासी न का तेव्हा पुसे कृष्णास द्रौपदी॥२॥

खेचिले केश, तेव्हा तू विश्वसी पांडवांवरी।
मारसी हाक त्यांना तू भीष्म द्रोणासही तशी॥३॥

दिसेना वालि, तेव्हांची मजला हाक मारसी।
म्हणे कृष्ण, मिळे हाक आलो धावून सत्वरी॥४॥

पांडवांची मनीं आशा, मजला द्वार बंद ते।
आतूर रक्षण्या तुज मी, परी धावू कसा शके॥५॥

जगाची सोडुनी आशा जेव्हा प्रार्थिसि तू मला।
ऐकता हाक ती आर्त आलो मी भेटण्या तुला॥६॥

२१) परमात्मा निर्गुण निराकार असला तरी सगुण भक्तीने आपण त्याच्या अस्तित्वाचा अनुभव घेऊ शकतो.

२२) निजास विसरे जेव्हा भक्त तो जगतासही।
एकरूपचि देवासी भासे चैतन्य तत्क्षणी॥

२३) प्रपंचात इन्द्रिय-विषय संयोग अटळ आहे. कर्मयोग्यानेसुद्धा विषयोपभोग जरूर घ्यावा, पण विषयांच्या आहारी न जाता मनानिग्रहाने विषयांनाच आपले दास करून मात्र तो घ्यावा.

२४) एकनाथांच्या आदर्श संसारातील गृहसौख्य चाखण्याचा मोह प्रत्यक्ष परमेश्वरालाही आवरता आला नाही.

भगवान श्रीकृष्ण म्हणतात -

मलाहि जाहला मोह चाखण्या गृहसौख ते।
सुख स्वर्गाहुनी श्रेष्ठ एकनाथागृहींच जे॥
झालो मी पाणक्या त्याचा देवी रोष जरी धरी।
रमलो करता सेवा डुंबलो सुखसागरी॥

२४) नामाचे औषध, आणि सदाचाराचे पथ्य या दोन गोष्टी पाळल्यास भवरोग नाहीसा होण्यास वेळ लागत नाही. अशा भक्तास नामसाधनेने ईश्वराच्या सहवासाचा अनुभव निश्चित मिळतो.

२५) वासना पूर्वजन्मींच्या त्यांनी हा जन्म लाभला।
वासना-मुक्त होवोनी, टाळावा जन्म तो पुन्हा॥

२६) गेल्या शतकात विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाला सुखसोयींची अगणित साधने उपलब्ध झाली आहेत. त्या प्रमाणात तो सुखी तर दिसत नाहीच, पण त्याच्या मनावरचा ताण मात्र अमाप वाढलेला दिसतो. त्यावर उपाय?

२७) विज्ञानाने प्राप्त झालेल्या सुखसोयींचा उपभोग कर्मयोगाच्या युक्तीने घेतला तरच त्यापासून उपाधीविरहित सुख मिळू शकते.

२८) काळ हा अनादी-अनंत आहे आणि तो सर्वांचा 'काळ' आहे. भगवंताशिवाय कोणालाही भीत नाही. म्हणून जो भगवंताचा झाला त्याला काळाची भीती वाटत नाही.

२९) नामात स्थिर होणे हेच दुःख-काळजी रोगावर रामबाण औषध आहे.

३०) नाम घेताना हा प्रपंच माझा नसून परमेश्वराचाच आहे, 'इदं न मम' अशीच भावना असली पाहिजे.

३१) नामाने जो साक्षीरूप देवाशी जोडलेला राहतो तो स्वतःही केवळ साक्षी-भावनेने संसार करतो. त्यामुळे संसारातील सुखदुःखापासून अलिप्त राहू शकतो.

३२) प्रारब्धोद्भव विपत्ती का दुःखे कोणालाच (संत देवांनाही) टाळता येत नाहीत, परंतु जो साधक नामाने ईश्वराशी जोडला गेला आहे, त्याला ते दुःख जाणवत नाही, जाणवले तरी ते सौम्य भासते.

३३) नामसाधनेच्या प्रभावाने प्राप्त झालेल्या सिद्धींचा अहंकार-ज्वर हा नामाच्या लशीनेच उतरावावा लागतो.

३४) कर्म न सोडता फक्त कर्मफळ ईश्वरावर सोडून सर्व बलबुद्धीने प्रयत्नरत राहणे, हाच खरा सुखाचा मार्ग आहे.

३५) देवाला विसरून (देवाच्या अधिष्ठानाशिवाय) केवळ स्वार्थासाठी केलेली कर्मकांडीय कर्मे परमार्थाच्या दृष्टीने व्यर्थ होत.

३६) आयत्या वेळी पूर्वसूचना न देता उपस्थित होणाऱ्या पाहुण्याला अतिथी म्हणतात. अशा अतिथीला देव मानून त्याला आपल्या परीने उत्तम भोजन घालणे म्हणजेच 'अतिथिदेवो भव' या मंत्राचे पालन करणे होय. हीच वैदिक-संस्कृती आहे.

३७) भक्तीच्या कोणत्याही प्रकारात नाम हे अनिवार्य आहे. आपल्यातले दोष काढून सदाचाराने सत्कर्मे करताना शुद्ध मनाने ईश्वराचे नाम घेणे, हीच खरी ईश्वर सेवा, हीच खरी परा भक्ती!

३८) किंचितही दुर्लक्ष न करता देहाने प्रापंचिक कर्तव्ये सर्व बलबुद्धीने पार पाडत असताना मनामध्ये मात्र अखंड नाम घेणे, हेच सर्व पोथ्यांच्या उपदेशाचे सार आहे.

३९) सगुण भक्तीनेच निर्गुणाकडे जावयाचे असल्यामुळे खऱ्या भक्ताला निर्गुण परब्रह्मतत्त्वाची

ओळख असणे आवश्यक आहे.

४०) नामाने देवाचा सहवास व सहवासाने त्याचे प्रेम मिळते. प्रेमाने तो आपला धाता व त्राताच बनतो, मग प्रपंचात भीती व काळजीचे कारणच उरत नाही.

४१) सगुणाच्याच भक्तीने नित्य नामात रंगता।
पडे विसर देहाचा जीवनमुक्तचि जाहला॥

४२) रोगास काळजीच्या या अनुसंधान औषध।
काळजी जितके मारी तितके तारि नामच॥

४३) अद्वैताच्या अवस्थेत पोहोचलेल्या ऋषींनीच नाममंत्र दिले असल्यामुळे ते नामच आपल्या जिवाला शिवाशी जोडू शकते. ( अद्वैत पावू शकते.)

४४) आपले जीवन काळाच स्वाधीन आहे, जो काळ फक्त भगवंताच्या स्वाधीन आहे आणि तो भगवंत मात्र नामाच्या स्वाधीन आहे, असा आहे नामाचा महिमा!

४५) नामाने निर्गुणाला सगुणरूप मिळते व सगुणरुपामुळेच (ईश्वराशी) अनुसंधान सोपे होते.

४६) देहबुद्धी जशी मावळत जाते त्याप्रमाणे देवबुद्धी वृद्धिंगत होत जाते आणि परमेश्वर जवळ जवळ येत असल्याचा अनुभव भक्ताला येऊ लागतो.

४७) यात्रा व्रतवैकल्यांचे सार्थक तेव्हाच झाले समजावे, जेव्हा नामात प्रेम उत्पन्न होऊ लागते!

४८) कामक्रोधादी मनोविकारही ईश्वरानिर्मितच आहेत. त्यांचे दास न होता, त्यांनाच आपले दास केले (मनोनिग्रहाने) तर त्यांचाही उपयोग परमार्थमार्गी होऊ शकतो.

४९) मानावे ईशभेटीचे प्रपंचासचि साधन।
ईश्वरास न मानावे प्रपंचास्तव साधन॥

५०) मनोविकारांवर मनाच्या निग्रहाने विजय मिळविणे (त्यांना आपले दास करणे) हे ज्याला कळले, त्यालाच सर्व कळले असे म्हणावे लागेल.

५१) विषयांच्या वासनेने बुद्धी भ्रष्ट होणे हेच कलीचे लक्षण, नाम त्याच्या मुळावरच घाव घालते, म्हणून नामधारकाला कलीची बाधा होऊ शकत नाही.

५२) नुसती कर्मकांडी प्रिय कर्मे नामाच्या भक्ती शिवाय व्यर्थ होत. नामसाधनेने वेदांचा तत्त्वार्थ आपोआपच उमजू लागतो.

५३) मागण्या वस्तुभोगांना प्रार्थिणे ईश्वरासची।
विषयांचीच भक्ती ती, भगवंताचि हो न ती॥

५४) विवेक ज्ञान वैराग्य नामाने होति प्राप्तच।
बोल हे साधुसंतांचे कसे होतील फोलच॥

५५) नामाला अंत नाही, ते श्वासाप्रमाणेच शेवटच्या क्षणापर्यंत निरंतर मुखातून यावे.

नामसाधनेवरील बोधवाक्यांची ही लेखमाला या सहाव्या लेखांकाबरोबर समाप्त झाली.

**प्र. सि. मराठे**
४०२ सनफ्लॉवर, ठक्कर पार्क,
वाकोला, सांताक्रूझ (पूर्व),
मुंबई - ४०००५५
दूरध्वनी - २६६७२२०५
भ्रमणध्वनी - ९६१९८९६४३५

●●●

(मुख पृष्ठावरून) **संपादकीय**

भाषा आहे. पाणिनी हे सुमारे अडीच हजार वर्षांपुर्वी होऊन गेले. अष्टाध्यायी हा त्यांचा सुमारे चार हजार सूत्रांमध्ये लिहिलेला व्याकरणग्रंथ. भारतात पाणिनीच्या आधी आणि पाणिनींकालीनही अनेक भाषा होत्या, पण त्यांच्या भौगोलिक मर्यादेमुळे व्यापक संवादाकरिता त्या पुरेशा नव्हत्या. कदाचित यामुळेच पाणिनींला एका प्रमाणभाषेची निर्मिती करावीशी वाटली असेल. पाणिनी स्वतः अष्टध्यायीमध्ये आधीच्या नऊ ते दहा व्याकरणकर्त्यांची नावे देतात. दुदैवाने त्यांचे कुठलेही ग्रंथ आज उपलब्ध नाहीत. पाणिनींच्या संस्कृतच्या निर्मितीनंतर ही सगळी व्याकरणे निष्प्रभ झालेली दिसतात. पाणिनीनंतरही जैनांनी आपले एक व्याकरण करण्याचा प्रयत्न केलाच होता, पण तो फारसा यशस्वी झाला नाही.

आज इंग्रजीमुळे जग जसे जवळ आले आहे, तसेच संस्कृतमुळे कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंतचा भारत एक झाला होता. यामुळेच भारताच्या सगळ्या प्रांतांमधून कथा, कादंबऱ्या, आध्यात्म, विज्ञान या संस्कृतीच्या सगळ्या अंगांवरती संस्कृतमध्ये विपुल लिखाण झाले. आज कित्येक हस्तलिखिते नष्ट झाली असली तरी तीस लाखांहूनही अधिक संस्कृत हस्तलिखिते भारत आणि भारताबाहेरील ग्रंथालयांमध्ये उपलब्ध आहेत. संस्कृतमध्ये उपलब्ध असलेले साहित्य हेच संस्कृतचे बलस्थान आहे. अडीच हजार वर्षांच्या भारतीय संस्कृतीच्या सामाजिक, आर्थिक, धार्मिक, आध्यात्मिक, कला आणि विज्ञानाचे प्रतिबिंब या लिखाणामध्ये आहे. १९५३ साली India as known to Panini, A study of the cultural material of the Ashtadhyayi', हा सुमारे ६०० पानांचा वासुदेवशरण अगरवाल यांनी लिहिलेला ग्रंथ लखनौ विद्यापीठाने प्रकाशित केला. अडीच हजार वर्षांपूर्वी लिहिल्या गेलेल्या अष्टाध्यायीमध्ये प्रतिबिंबित झालेल्या तत्कालीन समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक, आर्थिक अंगांवर या ग्रंथामध्ये चर्चा आहे. बौद्ध आणि जैन धर्मही सुमारे अडीच हजार वर्षे जुने आहेत. त्यांचे सुरुवातीचे ग्रंथ अनुक्रमे पाली आणि अर्धमागधी भाषेतून असले तरी, पुढे त्यांना या भाषांचा त्याग करून आपली सगळी ग्रंथसंपदा ही संस्कृतमध्येच करायला लागली. याचे कारण जरी आपण शोधण्याचा प्रयत्न केला, तरी कुठल्याही संस्कृतीला आपला विकास आणि ज्ञानप्रसाराकरिता प्रमाणभाषेची गरज का लागते हे सहज लक्षात येईल.

सोळाव्या शतकात युरोपमधून भारतामध्ये धर्मप्रसारक येऊ लागले. प्रामुख्याने ते दक्षिण भारत आणि गोव्यामध्ये जास्त कार्यरत होते. लोकांशी संवाद साधायचा तर भाषेवर प्रभुत्व असणे किती महत्त्वाचे आहे हे त्यांच्या लक्षात आले, आणि त्यातूनच त्यांनी संस्कृत आणि प्रादेशिक भाषांच्या अभ्यासाला सुरुवात केली. धर्मप्रसाराचे काम करत असताना त्यांना आपल्या संस्कृतीतील अध्यात्म आणि विज्ञानाच्या प्रगतीने आश्चर्यचकित करून टाकले. हे बहुसंख्य लेखन संस्कृतमधून होते. संस्कृत आणि प्रांतिक भाषांच्या अभ्यासातून त्यांनी ते विज्ञानपर लेखन आणि त्याची माहिती युरोपमध्ये द्यायला सुरुवात केली. आजही या माहितीचा अभ्यास, पाश्चात्त्य विद्यापीठांतून चालू आहे.

१५६३ साली गार्सिया दी ओर्ता (Garciade Orta) या गोव्यामध्ये काम करणाऱ्या पोर्तुगीज अभ्यासकाने भारतातील

औषधे आणि वनस्पतींची माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ लिहून तो युरोपमध्ये प्रकाशित केला. हेंड्रिक ॲड्रियान व्हॅन रीड (Hendrit Andrian Van Rheede) हे केरळमध्ये धर्मप्रसाराचे काम करीत होते. १६७८ ते १६९३ या कालावधीत त्यांनी हॉलंडमधून 'हॉर्टस मलबारिक्स्' (Hortus Malabaricus) हा बारा खंडातील लॅटिन भाषेमधील, दक्षिण भारतातील औषधी वनस्पतींची माहिती देणारा ग्रंथ प्रकाशित केला. ही माहिती त्यांनी अत्यंत काटेकोरेपणे तत्कालीन पंडित आणि वैदू यांच्याकडून मिळविली होती. युरोपमध्ये नंतर लिहिल्या गेलेल्या वनस्पतिशास्त्राच्या अभ्यासामध्ये या दोन्ही धर्मप्रसारकांनी दिलेली माहिती कमी-अधिक प्रमाणात अंतर्भूत करण्यात आलेली आहे. सर्पदंशापासून स्थापत्यशास्त्रापर्यंतचे अनेक ग्रंथ धर्मप्रसारकांनी भाषांतरित करून किंवा मूळ पोथीस्वरूपात युरोपमध्ये नेले. जर्मन धर्मप्रसारक हेन्री रॉथ (Heinrich Roth) हा १६५२ साली गोव्यामध्ये आला. पर्शियन, कन्नड, उर्दू या भाषांबरोबरच त्याने संस्कृतवरही प्रभुत्व मिळविले. इतकेच नाही तर १६६० च्या सुमाराला त्यानी चक्क पाणिनीच्या व्याकरणाचे लॅटिनमध्ये भाषांतर केले. १६५१ साली अब्राहम रॉजिरियस (Abraham Rogerius) या डच धर्मप्रसारकाने हिंदू देवदेवतांची माहिती युरोपमध्ये प्रकाशित केली. 'पद्मनाभ' या पंडिताच्या मदतीने त्यांनी भर्तृहरीच्या नीतीशतकांचे पोर्तुगीज आणि लगेचच डच भाषेत भाषांतर केले. संस्कृतमधील अशा अनेक विषयांवर धर्मप्रसारकांनी केलेल्या भाषांतराची यादी खूप मोठी आहे.

१७८३ साली सर विल्यम जोन्स (William Jones) कलकत्त्यामधील न्यायालयात न्यायाधीश म्हणून नियुक्त झाले. १७८४ साली त्यांनी ऐशियाटिक सोसायटीची स्थापना केली. प्रथम शाकुंतलचे (१७८९) आणि नंतर मनुस्मृतीचे (१७९४) भाषांतर करून भारतीय संस्कृती आणि संस्कृतच्या अभ्यासाच्या एका नव्या अध्यायाला त्यांनी सुरुवात केली. चार्लस् विल्किन्स (Charles wilkins,1749-1836) ॲलेक्झांडर हॅमिल्टन (Alexander Hamitton, 1762-1824) आणि कुलब्रुक (Colebrook) या त्यांच्या सहकाऱ्यांनीही संस्कृतचा अभ्यास करुन संस्कृतमधील महत्वाच्या ग्रंथांचे भाषांतर करणे चालू केले. हा सगळा इतिहास फार मोठा आहे आणि त्यावर अनेक संशोधनपर ग्रंथही उपलब्ध आहेत. विल्यम जोन्स यांना पर्शियन, ग्रीक आणि लॅटिन भाषांची चांगली जाण होती. संस्कृतचा अभ्यास करत असतांना, संस्कृत आणि या भाषांमध्ये दिसणारे विलक्षण साम्य त्यांना दिसून आले. त्यांनी स्थापन केलेल्या एशियाटिक सोसायटीच्या वार्षिक सभेमध्ये ते भाषण देत. आपल्या १७८६ साली दिलेल्या भाषणामध्ये त्यांनी या भाषासाधर्म्यावर क्रांतिकारक भाष्य केले -

"So strong indeed, that no philologer could examine them all three, without believing them to have sprung from some common source, which perhaps, no longer exists; there is a similar reason, though not quite so forcible, for supposing that both the Gothick and Celtick, though blended with a very different idiom, had the same origin with the Sanscrit : and the old persian might be added to the same family...."

'भारोपीय' (Indo europian) भाषासमूहाचा सिद्धान्त यातूनच पुढे विकसित झाला आणि या भाषांचा तौलनिक अभ्यास करीत भाषविज्ञानाची वेगळी शाखाच युरोपमध्ये उदयाला आली. विल्यम जोन्स यांच्याआधी हालहेड (Halhed) या अभ्यासकाने Grammar of Bengal Language हे पुस्तक १७८७ साली प्रकाशित केले. त्यालाही ग्रीक, लॅटिन आणि संस्कृतमधील साधर्म्य बघून आश्‍चर्य वाटले आणि त्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांने लिहून ठेवले,

every part of speech and every distinction, which is to be found in either Greek or Latin and that in some particulars it is more copious than either... I do not attempt to ascertain as a fact, either Greek or Latin are derived from this language, but I give a few reasons where in such a conjecture might be founded : and I am sure that it is a better claim to the honour of a parent than, Phoenician or Hebrew'.

फिलिपो सॅसेट्टी (Filippo Sassetti 1540-1588) हा इटालियन धर्मप्रसारक १५८३ साली कोचीनमध्ये आला. तेथील चालीरिती, धार्मिक समजुती आणि संस्कृत भाषेचा तो अभ्यास करूलागला. संस्कृत आणि इटालियन भाषेतील अनेक शब्दांमधील साधर्म्य पाहून तोही चक्रावून गेला. 'भारोपीय' भाषांच्या सिद्धान्ताआधी हे साधर्म्य मांडणारा हा पहिलाच युरोपीय अभ्यासक म्हणायला हवा.

या सगळ्याचाच परिपाक म्हणून युरोपमध्ये विद्यापीठांमधून संस्कृतच्या अभ्यासाची सुरुवात झाली. १८१४ साली फ्रान्स, १८१६ साली जर्मनी, नंतर लगेचच इंग्लंड, १८३५ साली फिनलंड तसेच हॉलंड, डेन्मार्क, रशिया या देशांच्या विद्यापीठांमधून संस्कृतच्या अभ्यासाची सुरुवात झाली. गेल्या दोन शतकांमध्ये तेथून तौलनिक भाषाविज्ञान आणि संस्कृत भाषेवरती मूलभूत संशोधन झाले आहे. आश्‍चर्याची गोष्ट म्हणजे भारत यामध्ये खूपच मागे आहे. आजही, कुठल्याही भारतीय प्रांतिक भाषांपेक्षा संस्कृतीचा अभ्यास करणारी विद्यापीठांची दालने जगात जास्त आहेत. संस्कृतच्या जागतिक परिषदेला सबंध जगातून सुमारे वीस-पंचवीस देशांचे प्रतिनिधित्व करीत ३०० ते ४०० प्रतिनिधी उपस्थित असतात.

आजचा आपला संस्कृतचा द्वेष कुठल्याही प्रांतीय भाषेला तसूभरही पुढे घेऊन जाऊ शकत नाही. संस्कृतचे अतिउत्साही प्रचारक, राजकारणी आणि भाषावैज्ञानिक हे सर्वच या गोंधळाला सारखेच जबाबदार आहेत. संस्कृतमध्ये आज भारतीय संस्कृतीशी निगडित एवढे साहित्य उपलब्ध आहे की त्याचा अभ्यास आणि संशोधन हे जगभर चालूच राहणार आहे.

संस्कृतच्या नाही तर आपल्या फायद्याकरिता संस्कृत शिकणे किती आवश्यक आहे, हे ज्या दिवशी आपल्याला कळेल तो सुदिन म्हणायचा!

**संपादक** : डॉ. विजय वासुदेव बेडेकर
**प्रकाशक व मुद्रक** : अनंत विनायक धोरे, लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१
**मुद्रणस्थळ** : परफेक्ट प्रिन्टस्, नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१